# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९७**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
ठाणे • ठाणे • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक १० / सप्टेंबर २००५

## संपादकीय

### १९०५ ते २००५

१४ मार्च १८७९ आणि १९०५ हे वर्ष विज्ञानाच्या इतिहासातून कधीही वजा करणे शक्य नाही. विज्ञानाची आजवरची गती आणि प्रगती आणि भविष्यातील संभाव्य परिणामकारकता या सर्वांवर अत्यंत मूलगामी परिणाम करू शकेल अशा 'सापेक्षतावादा' चा सिद्धांत मांडणाऱ्या आल्बर्ट आइन्स्टाईनचा जन्म १८७९ साली १४ मार्चला झाला, तर न्यूटनच्या आयुष्यात १६६६ हे वर्ष जसे 'मिरॅकल्स् इअर' ठरले, तसे १९०५ हे वर्ष आइन्स्टाईनच्या आयुष्यात 'मिरॅकल्स्' ठरले. या वर्षी त्याने लिहिलेल्या पाचपैकी तीन प्रबंध युगप्रवर्तक असे होते. स्पेशल थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी, ब्राउनियन मोशन आणि फोटोइलेक्ट्रिक इफेक्ट हे ते तीन प्रबंध होत.

'तुला आयुष्यात कधीच काही जमणार नाही' असं त्याला सांगणारी शिक्षिका, त्याची 'स्लो लर्नर' ही असणारी ओळख आणि त्या पार्श्वभूमीवर घडत गेलेलं त्याचं जीवन, गणित आणि लॅटिनवर त्याचं असणारं प्रभुत्व हे सर्वच आश्चर्य आहे. तसेच त्याने उपरोक्त प्रबंध त्याने कोणतीही प्रयोगशाळा न वापरता वैचारिक प्रयोगांच्या जोरावर, तर्कांच्या जोरावर सादर केले हे आणखी मोठे आश्चर्य आहे.

आइन्स्टाईनच्या सापेक्षतावादाला २००५ साली शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. 'क्वांटम' सिद्धांताला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. गेली एकूणच शंभर वर्षात पदार्थ विज्ञान, गणित, अवकाश विज्ञान या शाखांमध्ये अनेक परिणामकारक थिअरीज् मांडल्या गेल्या, डाइमस् निर्माण झाले. म्हणूनच हे वर्ष आंतरराष्ट्रीय पदार्थ विज्ञान वर्ष म्हणून जगभर साजरे केले जात आहे.

२१व्या शतकाची पहाट असं आजच्या काळाचं वर्णन केलं जातंय! माहिती तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान अशा अनेकानेक, कल्पना वाटू शकल्या असत्या अशा क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक ठरतील असे बदल होत आहेत, होणार आहेत. जगभर होणाऱ्या परिषदा, कार्यशाळा यातून यावर विचारमंथन होईल.

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पदार्थ विज्ञान विभागाने मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासकांचे विचार मंथन असणारी परिषद आयोजित केली आहे. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या या परिषदेच्या या विषयाच्या अनुषंगाने विज्ञान चिंतनाला नव्या दिशा मिळणार आहेत. अर्थातच विज्ञानप्रेमींसाठी ही सुसंधी ठरेल. या राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने काही स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले आहे. त्यासंबंधात आमच्या पदार्थ विज्ञान विभाग प्रमुखांशी संपर्क साधावा.




वर्ष सहावे / अंक १० / सप्टेंबर २००५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठ

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ३रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | हिंदू धर्मात मूर्तीपूजेचे स्थान | शं. वा. मठ | ३ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मंडिल व साधने | यशवंत साने | ७ |
| ३) | मुंबई ते हर्णै पदयात्रा-एक रोमांचक अनुभव | मुकुंद लागू | १४ |
| ४) | गीतेच्या गाभाऱ्यात (भाग १-२) | आशा भिडे | १८ |
| ५) | ग्रंथपासनेसाठी ज्ञानपंचमी | डॉ. नरेंद्र बोरवारे | २३ |
| ६) | जगावेगळ्या (पुस्तक परिचय) | प्रा. मोहन पाठक | २५ |
| ७) | चतुरस्त्र लेखक प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | शरद जोशी | २७ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# हिंदू धर्मात मूर्तिपूजेचे स्थान

*सर्व चराचरात ईश्वर पहाणारी भारतीय संस्कृती. या संस्कृतीने मनातील ईश्वराला साकार रूप देतान मूर्त रूप देतांना ज्या मूर्ती या संस्कृतीत मान्य पावत गेल्या त्या विषयांची ही लेख माला. यातील चौथा लेख देत आहोत.*

*- संपादक*

(भाग चौथा)

## हिंदू मूर्तिपूजक

हिंदू धर्मीय मूर्तीपूजक असल्याने त्याचे इतर धर्माहून असलेले विशेषत्व ध्यानात येते. प्रत्येक प्रांत, प्रत्येक शहर, प्रत्येक गाव, प्रत्येक खेडे किंबुहना प्रत्येक गल्लीत एखादे तरी देऊळ असतेच. कमीत कमी एखादी घुमटी तरी असतेच. मंदिरातून पूजा अर्चा इत्यादी धार्मिक कृत्ये करावयास कोणाही हिंदूला संकोच वाटत नाही. तीर्थ आणि क्षेत्रे ही तर हिंदूंच्या यात्रेची ठिकाणे. ही सामुदायिक पूजा स्थानेच होत. हिंदुधर्मातील यच्चयावत स्त्री-पुरुष, छोटा-मोठा, श्रीमंत गरीब, आदी भेद-भाव विसरून या स्थळी एकोप्याने सर्वांना समान संधी देत सामुहिक पूजा पार पाडताना दिसतात. अत्यंत सश्रध्दतेने सर्वच मंडळी पूजा अर्चा आदी देवताराधन पार पाडत असतात. थोडक्यात प्रत्येक भूभाग हे धर्मस्थान मानले जाते. इतकेच नव्हे दऱ्या-खोऱ्यातून डोंगर कपारीतूनही हिंदूंची मंदिरे आढळतात. अशा प्रकारे हिंदुस्थान हा मूर्तिपूजकांचा देश असल्याने त्याचा विचार करावयास झाल्यास हिंदु धर्मात मूर्ती पूजेला इतके महत्त्वाचे स्थान का देण्यात आले आहे याचा विचार करणे आवश्यक ठरेल.

## अनेकात एकत्व

सर्व जगात हिंदु धर्माची बरोबरी करू शकेल असा धर्म नाही. बाह्यतः तो अनेक देवता मानणारा व मूर्ती पूजक असा आहे; आणि तत्वतः तो निर्गुण उपासक असून निरीश्वरवादीही आहे. सगुण साकारापासून निर्गुण निराकारापर्यंत सर्व प्रकारच्या उपासना पद्धतींना हिंदुधर्मात मान्यता प्राप्त झालेली आहे. प्रत्येक हिंदु पूजाविधींसाठी आसनावर बसतो त्या वेळी तो सोऽहं असे म्हणतो. म्हणजे तो मी आहे. याला शास्त्रीय आधार आहे. शास्त्र सांगते 'शिवो भूत्वा शिवं यजेत् ।' शिव भूमिका धारण करून शिवाची पूजा करावी, हेच श्रेष्ठ प्रकारचे पूजन आहे हे मनोमनी प्रत्येक हिंदु मात्राला पटलेले असते. मूर्तिपूजा ही एक व्यावहारिक गोष्ट आहे. अमर्याद तत्त्वाचे आकलन होण्यासाठी हा एक सोपा मार्ग आहे. वेदान्तात देखील ही धर्म संकल्पनेतील मूर्तिपूजा मान्य केली आहे. हिंदु धर्म नेहमीच सहिष्णु राहिला असल्याने ही गोष्ट त्याला सहज करता येत असते. हिंदुधर्मात अनेकानेक दर्शने आहेत. परंतु या साऱ्या विविधते मागे एकत्वाचे सूत्र असल्याचे सर्व दर्शनकारांनी मान्य केले आहे.

इतकेच काय प्रांतांगणिक व घरागणिक धार्मिक कृत्यात वेगळ्या पूजा पद्धती स्वीकारल्या जात असतानाही या साऱ्या गोष्टींच्या मुळाशी वेदातील एकत्वाचीच शिकवण असते ही गोष्ट दृष्टीआड कधीच करता कामा नये. प्रत्येकाच्या घरात मूर्ती असतेच, म्हणजेच सर्व श्रेष्ठतत्वाचे अस्तित्व सर्वांनाच मान्य असते. सर्वच हिंदु समाज तो तत्त्वज्ञ असो, सर्व सामान्य नागरिक असो, तो सगुण रूपात ईश्वराधन करतो. परंतु हिंदू धर्माची ही शिकवण पुराणकाळात विशेष दृढ झाली. तेव्हापासून अवतार कल्पना स्वीकारली गेली. राम व कृष्ण आदी अवतार मानले गेले व त्यांची उपासना अत्यंत श्रद्धा पूर्वक अक्षुण्णपणे चालू आहे. यांची मोठाली मंदिरे उभी राहिली यांच्यामुळे अनेक तीर्थ क्षेत्रांना पावित्र्य निर्माण झाले. त्या

साऱ्यांचे महत्त्व हिंदूना फार वाटते. त्यामुळे तेथील नद्या पर्वत इत्यादींबद्दलचा आदर अद्याप आढळतो. प्रत्येक बदल आत्मसात करुन उत्क्रांत होणारा व बाह्य बदल कितीही झाले तरी आंतरिक तत्त्व व वेदकालापासून चालत आले आहे ते तसेच जतन करणारा हा एकमेव धर्म पृथ्वीच्या पाठीवर आहे. त्यामुळे हिंदु धर्माची तत्त्वे सनातन असून सगळ्याबदलाच्या पलीकडे ती टिकून राहणारी आहेत. प्रत्येकाला आपल्या कल्पनेप्रमाणे इष्ट देवता स्वीकारण्याची मुभा ठेवण्यात आली आहे. असे असतानाही सहिष्णुतेच्या भूमिकेला धक्का लावला जात नाही. प्रत्येक व्यक्ती गुण्यागोविंदाने आपल्या इष्ट देवतेची आराधना करते. सर्वच हिंदुमध्ये श्रद्धा हाच महत्त्वाचा भाग या आराधने मागे असतो.

**विविध पंथ या विशाल धर्मांच्या शाखा.**

या विशाल धर्मापासूनच विविध पंथ निघाले आहेत. हे पंथ म्हणजे जणू एकाच वृक्षाच्या अनेक फांद्यांच होत. वृक्ष आणि फांदीत स्वगत भेद जरूर असला तरी खऱ्या अर्थाने भेद नाहीत. शैव, वैष्णव, शाक्त, गाणपत्य, सौर ही खऱ्या अर्थाने भिन्न धर्म पंथ नसून एकाच विशाल धर्माची अंग-प्रत्यंगे आहेत. या इथे एक गोष्ट विशेष रीतीने ध्यानात घ्यावयास हवे. प्रत्येकालाच एकाच पद्धतीने उपासना करणे जमत नाही. अथवा एकाच प्रकारची पद्धती वा व्यवहार सर्वांना जमवणे संभवत नाही. त्यात विविधता आढळते. या मानवी मनाच्या ठेवणीचा विचार करून सुरुवातीपासूनच हिंदु धर्माने प्रत्येकाला आपल्या मानसिक ठेवणी प्रमाणे इष्ट देवता निवडावी याचे स्वातंत्र्य देऊन टाकले. हे श्रेष्ठ प्रतीचे वैचारिक स्वातंत्र्य हिंदूना प्राप्त झाल्याने उपासना प्रांतात अधिकार भेद निर्माण झाला. परंतु तत्त्वतः त्यांच्यात कसलाही भेद संभावत नाही. हा विचार सातत्याने मांडला जातो असतो. महिम्न स्तोत्रात पुष्पदंत म्हणतो, ''**रुचीणां वैचित्र्यात् ऋजु कुटिला नानापथजुषां** । नृणां एको गम्यः त्वमसि पयसां अर्णव इव।'' आपआपल्या आवडीप्रमाणे प्रत्येक माणूस तुझी आराधना करत असला तरी हे भगवंता वेडे वाकडी वाहणारी नदी शेवटी समुद्रालाच मिळते. त्याप्रमाणे विविध पद्धतीने आराधना करणारा माणूसही तुलाच येवून प्राप्त होतो.

**प्रतिमा**

इंग्रजीभाषेत मूर्तीला 'आयडोल' असे म्हणतात. ह्या अर्थी हिंदूंची मूर्तीबद्दल कल्पना नाही. तर प्रतिमा, प्रतिबिंब, छाया या अर्थी त्या भाषेत 'इमेज' असा जो शब्द आहे तो बराचसा मिळता जुळता आहे. प्रतिमा ही परमेश्वराकडे प्रवाहित करणारी आहे. एखाद्याचे छायाचित्र असते त्यातून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व चटकन मनात भरते तसे प्रतिमा पूजनाने हिंदूंचे होते आणि अंतर्यामी त्यातील आशय प्रस्थापित होतो. कारण प्रतिमेमध्ये तुल्यता संभवते. मूळ रुपाचे प्रतिबिंब या भूमिकेतून प्रतिमा पूजन केले जाते. सर्व श्रेष्ठ तत्त्वाचे प्रतिबिंब करणारी, साकार रूपात इंद्रियांना भावणारी प्रतिमा या रुपात हिंदू आपल्या इष्ट देवतेच्या मूर्तीतून अनुभवितो. त्याला हे नक्की माहीत असते की पारमार्थिक दृष्ट्या परमात्मा निर्गुण निराकार आहे. परंतु हे परमात्म्याचे स्वरुप अंतिम मानले जाते. आराधनेच्या दृष्टीने हे अंतिम स्वरुप अनुपयुक्त आहे. याच कारणाने परमात्म्याला सगुण रूप दिले गेले. या सगुण रुपातच ईश्वर हा निर्माता रक्षणकर्ता, असे कल्पिण्यात आले. यालाच हिंदूनी 'सोपाधिक ईश्वर' असे म्हटले आहे. थोडक्यात प्रतिमा म्हणजे ईश्वराची प्रतिकृती वा प्रतिबिंब मानले गेले आहे. या प्रतिमेत प्रत्यक्ष परमेश्वराचे अधिष्ठान व अधिवास अभिव्यक्त होण्यासाठी एक विधी केला जातो. त्या वेळी त्या त्या देवतेला विशिष्ट आकृतीच्या मूर्तीत येऊन राहण्यासाठी आवाहन केले जाते. त्या विधीला 'प्राणप्रतिष्ठा' म्हणतात, व ती स्थिर होण्यासाठी 'स्थान प्रतिष्ठा' पण केली जाते. हे सारे वेद प्रणित शास्त्रानुरूप केले जाते.

वास्तविक संपूर्ण विश्वच परमात्म्याचे शरीर आहे. गीता देखील हीच गोष्ट सांगते. साधकाच्या प्रार्थनेसाठी, उपासनेसाठी, प्रतिकृती बनवून त्याची आराधना करण्याची नामी युक्ती या मूर्ती पूजेच्या द्वारा शोधून काढण्यात आली. मूर्ती प्रतिबिंब मात्र आहे याची जाण कधीच दृष्टी आड केली जात नाही. एवढ्या अमर्याद तत्त्वाचा आवाका ध्यानात येणे कठीण असल्याने हळू हळू त्या तत्त्वापासून आपण दूर जातो व मग त्याचा विसर पडतो. या विसराळू पणालाच 'माया' असे म्हणतात, या मायेमुळे परमात्म तत्त्व व जीवन यात महदंतर निर्माण होते, आणि या प्रतिमेमुळे पुनरपि या उभयताना सांधण्याचा एक प्रयत्न केला जातो. त्यामुळे परमात्मा व जीवात्मा जवळ येण्याची शक्यता निर्माण होते.

मानसशास्त्र दृष्ट्या प्रतिमा ही एक कल्पनामय गोष्ट आहे आणि कल्पना म्हणजे अनुभवलेल्या गोष्टीचा पुनः प्रत्यय घेणे होय. मूर्ती घडवण्यासाठी कल्पना करावी लागते. आणि कोणत्याही कलाकृतीतील प्रमुख गोष्ट कल्पना हीच असते. प्रतिमाही दैवी साक्षात्काराचा प्रत्यय पुनः आणून देते. साधकाला प्रतिमा ही पूर्णत्वाने व्याप्त असलेली गोष्ट आहे असेच वाटते. आणि त्यामुळे या प्रतिमेतून त्याला अपेक्षित वाटचाल करता येते.

**प्रतिकोपासना**

पूजेचा आणखी एक प्रकार संभवतो. त्याला 'प्रतिकोपासना' म्हणतात. या प्रकारात संपूर्ण विश्व हे ब्रह्म आहे असे मानले जाते म्हणून कोणताही भाग हा ब्रह्मांशच समजला जातो. आणि या अंशाच्या पूजनात संपूर्ण ब्रह्माचे पूजन करता येते. या जाणीवेने सूर्य, पृथ्वी, नक्षत्रे, नद्या ही सारी प्रतीके मानली गेली आणि त्या बद्दल आदरभाव व्यक्त करण्यात येतो. याही पुढे जाऊन काही चिन्हांच्या माध्यमातून या महान् तत्त्वाचा बोध घेतला गेला. यज्ञ हा देखील प्रतीक मानला गेला आहे. ॐकार हे वेदात प्रतिष्ठित झाले आहे इतकेच नव्हे तर ॐकार हे ब्रह्माचे अभिव्यक्त चिन्ह ठरले आहे. **ॐ इति एकाक्षरं ब्रह्म ।**

**कलेसाठी कला ही हिंदूंची दृष्टी नाही.**

हिंदूंची कला ही केवळ कलेसाठी नसून त्या कलाकृतीतून हिंदूंच्या आत्मिक जीवनाची अभिव्यक्ती होते. त्या कलेतुन जीवनातील सत्य, शिव आणि सुंदर हे साकार होत असते. मानवी मनाला अंतर्मुख करून नैसर्गिक प्रतिकृतीमध्ये रममाण करावयास लावणे हे कलेतून अपेक्षित असते. विश्वातील अनेक घडामोडींचे अनाकलनीय स्वरुप मानवी मनाच्या स्तरावर आणून ती ज्यावेळी अभिव्यक्त केली जाते. तेव्हा ती कला या नावारूपाला प्राप्त होते. जे अनाकलनीय आहे ते आकलनाच्या स्तरावर सत्य, शिव, सुंदर स्वरुपात अभिव्यक्त करणे म्हणजे कला होय. आणि हे सर्व कला कृतीचे मूळ आहे. अशी अभिव्यक्ती करण्यात मानव यशस्वी झाला आहे. निसर्गातील प्रत्येक घडामोड ही जिवंतपणाचे लक्षण असून त्यातून घडणारी कलाकृती ही त्या जिवंत स्पंदनातून साकार होणारी गोष्ट आहे. निसर्ग हा चैतन्यमय आहे. निसर्ग म्हणजे जिवंतपणाचा स्त्रोतच होय. त्यातून विस्फारित होणाऱ्या चैतन्य किरणांमुळे सजीव सृष्टी निर्माण होत असते. यामुळेच मानव निसर्गाला माता आणि पिता संबोधू लागला. एकदा निसर्ग आणि मानव यातील संबंध अशा प्रकारे प्रस्थापित झाल्यानंतर सगळ्या मानवी भावनांचे लेणे निसर्गाला चढविण्यात आले.

काही वेळा मूर्तीची मुद्रा सौम्य आढळते. काही वेळा कल्याणमय मुद्रेचे दर्शन घडते. काही वेळा ध्यानवस्थेतील मूर्ती पाहावयास मिळते, काही वेळा उग्र मूर्तीच्या दर्शनाने भीती वाटते. काही मूर्तीत चेहऱ्यावर कोमल भाव आढळतात. हे जे विधद मूर्तीतून अभिव्यक्त होत असते त्याचे कारण त्या त्या उपासकांना साधना करण्यासाठी ती ती मूर्ती उपयुक्त ठरत असते. साधनेसाठी मूर्तीचा उपयोग होत असतो. हिंदू मनाला मूर्ती या पूजावस्तू असून केवळ सौंदर्यासाठी त्या निर्माण करण्यात येत

नसतात. या अशा प्रकारच्या मूर्तीतून इष्ट देवतेचे ध्यान करता येते व उपासना करण्यास मदत होते. ही साधकाची ठाम कल्पना आहे. **'अभिरुपात् च बिंबानां देव: सान्निध्यं ऋच्छति ।'** योग्य अशा स्वरूपात साधकाला देवाचे सान्निध्य लाभते. या कलाकृतीत भाव अभिव्यक्तीला फार मोठे स्थान देण्यात आले आहे. सर्व श्रेष्ठ तत्व हे रस स्वरुप आहे. **रसो वै स:।** तो स्वत:च भावपूर्ण आहे. रस परिपोषावरूनच एखादी कलाकृती उत्कृष्ट आहे की नाही ही ठरविली जाते. आणि हा रस वा भाव पूजकांच्या मनात प्रतिबिंबित होतो. साधकांच्या मनातील भाव उद्दिपीत करण्यासाठी हे रस फार प्रभावी ठरले आहेत. रस हा काव्याचा व भाव हा शिल्पाचा आत्माच आहे.

कलाकाराना हे निश्चित माहीत होते की मूर्तीत अभिव्यक्त होणारे भाव साधकांच्या मनातील भावाशी सामरस्य पावताच अननुभूत असा एकत्वाचा आनंद साधकाला प्राप्त होतो, व त्यातून त्याला इष्ट देवता प्राप्ती होते. देवतांच्या बऱ्याचशा प्रतिकृति या ऋषि लोकांच्या कल्पनेतून साकार झालेल्या आहेत. ध्यानावस्थेत त्या प्रतिकृतींचे दर्शन त्याना घडते. तशा प्रकारची प्रतिकृती उपासनेसाठी निर्माण केली. निराकारता ही बौद्धिक कसरत होऊ शकेल. भावदृष्ट्या ही बौद्धिक कसरत अनुपयुक्त अत एव हा साकाराचा भावपूर्ण मार्ग ऋषींनी शोधून काढला.या कल्पना सर्व प्रथम मंत्ररुपाने प्रगटल्या. या मंत्रातून मानसिक स्तरावर सगुणरूप प्रथम उमटले. त्या मंत्रातून देव आणि देवतांची प्रतिकृती निश्चित रूप धारण करू लागली. शिल्पकारांच्या मदतीने या मानसिक देवता धातू, दगड, काष्ठ यातून प्रत्यक्ष उमटविल्या गेल्या.

प्रार्थना योग्य व फलद्रूप होण्यसाठी ऋषींना साकार मूर्तीची आवश्यकता भासू लागली. यालाच प्रतिकोपासना असे म्हणतात. योगीजन देखील ही प्रतीके म्हणजे एकाग्रतेची महान् उपयुक्त साधने आहेत असे मानून त्यांना जवळ करते झाले. पुरातन काळापासून अशा प्रकारे उपसना पद्धती अस्तित्वात आलेली पाहावयास मिळते. निर्गुण निराकार ब्रह्मालाच उपासनेसाठी सगुण कल्पून मानसिक स्तरावर आणले गेले. **''सगुण ब्रह्म विषयक मानस व्यापार: उपासनम् ।''** या मूर्तीच्या माध्यमातून साधक आपले ईप्सित प्राप्त करून घेऊ शकतात. मूर्तीच्या दर्शनाने पूजकाला तात्काल तो भाव धारण करणे सोपे जाते म्हणून विविध भावाच्या मूर्ती उपासनेसाठी उपयोगात आणल्या जाऊ लागल्या. ही एक मानसिक प्रक्रिया आहे.

### मूर्तीबद्दल आपली कल्पना

इतर देशात मूर्ती केवळ सौंदर्यासाठी अगर वस्तुसंग्रहालयासाठी घडविल्या जातात. आणि त्याचा उपयोग लोकाना सुंदर कलाकृतीचे दर्शन घडवून आणणे एवढाच असतो. ह्यासाठी मोठ्या समारंभपूर्वक त्याचे प्रदर्शन घडविले जाते. आपल्या देशात मूर्ती केवळ शोभच्या वस्तु नसून पूजेसाठी त्यांचा उपयोग केला जातो. त्या मूर्ती कधीच ऐहिकतेसाठी न राहता पावित्र्याचा व श्रध्देच्या भूमिका धारण करतात. या कारणामुळेच ऐतिहासिक व प्राचीन काळच्या मूर्तीसाठी स्वतंत्र मंदिरे उभी राहात व तिथे त्या मूर्तींचे पूजन केले जाते. कोणत्या देवळात किती मूर्ती असाव्यात या बद्दल शास्त्र विचार फार पूर्वीपासून केला गेला आहे. शिल्प संहिता, शिल्पयान आदी ग्रंथातून या बद्दल स्पष्ट नियम आढळतात. मातीच्या मूर्तीचे पूजन करून त्याचे विसर्जन करावे. आवाहन करताना प्राणप्रतिष्ठा विधि सांगितला आहे. तसेच विसर्जन विधीही सांगितला आहे. हे हिंदू धर्माचे एक वैशिष्ट्य आहे.

(क्रमश:)

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा सहावा लेख. विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## शास्त्रीय अभ्यास

संस्कृतीच्या शास्त्रीय अभ्यासात संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा, बीजाचा, स्वरुपाचा व साधना आणि प्रेरणा ह्यांचा विचार आवश्यक आहे. बहुतांशी, संस्कृती विषयावर तिच्या बाह्य स्वरूपावर, बाह्य दर्शनावर लिखाण केले जाते. त्यांत 'अभ्यासापेक्षा' 'वर्णनाची' दिशा प्रामुख्याने असते.

## कार्ल मार्क्सचा अभ्यास

कार्ल मार्क्स ह्याने समाजाचा अभ्यास करताना, मुख्यतः सामाजिक बदल घडवण्यास कोणते कारणीभूत फोर्सेस (शक्ती) किंवा प्रेरणा स्रोत असतात, यांचा विचार केला. 'आर्थिक शक्ती' ह्या मुख्य प्रेरणाशक्ती आहेत असा त्याचा दावा होता.

## भारतीय ज्ञान पद्धती

मग, सांस्कृतीक वैशिष्ट्यांच्या उगमात व त्या संस्कृतीच्या विस्तारात कोणत्या शक्ति व प्रेरणा कारणीभूत असतात यावर विचार व्हावयाला हवा. पुन्हा, ह्या विचारात किंवा अभ्यासात 'भारतीय' ज्ञानपद्धतीचा आधार न घेतल्यास पाश्चात्य अभ्यासाच्या पद्धतीवर निष्कर्ष काढले जातील हे एक 'Hybrid' 'मिश्रजातीय' पृथःकरण होईल व चुकीचे निष्कर्ष निघतील हे नक्की. ह्याचे मुख्य कारण म्हणजे, 'मानव' त्याच्या पृथ्वीवरच्या अस्तित्वाबद्दल, मर्त्य अस्तित्वाबद्दल, त्याच्या सूक्ष्म निद्रिस्त शक्ती व 'स्पिरुच्यूअल' आकांक्षाबद्दल, त्याच्या 'फॉर्म' म्हणजे शरीर, बुद्धी, अंतःकरण, निद्रिस्त शक्ती, सूक्ष्म शक्तीबद्दल, भारतीय ज्ञानपद्धतीत जी विलक्षण उपलब्ध सामुग्री आहे, तिच्या अनुषंगाने विचार केलेला दिसत नाही.

काय आहेत हे अभ्यास? ज्या वैशिष्ट्यांमुळे कोणत्या विशेष भूमिका 'भारतीय संस्कृती' व भारतीय समाजाला प्राप्त होतात? यांचा विचार ह्या लेखात करू या. ह्याची थोडीशी झलक तुटकपणे कां होईना, पण, 'दिशाच्या' मागील कांही अंकात मांडली आहे. पाश्चात्य संस्कृतीतील विचार पद्धती ही पिट्रीम सोरोकिनच्या अभ्यासातील उदाहरणाने मांडली आहे.

## नाथपंथीय दृष्टिकोन

महासिद्धयोगी गोरक्षनाथ ह्यांनी त्यांच्या अनेक संशोधनातून विश्वाच्या उत्पत्तीची, रचनेची, मानवी शारीरिक अस्तित्वाची माहिती सांगितली आहे. 'सिद्ध सिद्धांत पद्धति' ह्या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांत ही माहिती सापडेल. ज्ञानेश्वरांची कुंडलिनी जागृती (६वा अध्याय, ज्ञानेश्वरी) ही या ज्ञानावर आधारलेली आहे. हे नाथपंथीय शास्त्र व ज्ञान आहे.

ज्ञानेश्वरी, अनुभवामृत व पसायदान ह्या ज्ञानेश्वरांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीचा हा आधार आहे. कुंडलिनीशक्ती जागृती ही त्यातील आवश्यक साधना आहे. शक्तिपात पंथाचे गुळवणी महाराज, पुणे हे ही या ग्रंथाला आधारभूत मानत होते. 'देवात्म शक्ति' ह्या पुस्तकाचे ग्रंथकार महायोगी विष्णुतीर्थ महाराज (देवास, मध्य प्रदेश राज्य) ह्यांनीही मानवी शरीराचे सामान्यतः माहीत नसलेले पण दिव्य व अलौकिक शक्तिचे स्थान असलेले मानवी शरीराचे व आत्म्याचे दर्शन ह्या पुस्तकांतून

घडवलेले आहे.

पण, सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे हे दर्शन एका विशिष्ट भारतीय पद्धतीवर आधारलेले आहे. एरव्ही ते अशक्य आहे. कोणता हा विशेष?

### योगिक दृष्टिकोन

"It is well pointed out that while the ultimate object of Search is the same for a Yogi and a philosopher, their modes of approach are different, the latter's being intellectual and the former's intuitive and spiritual. The guest of the Yogi is direct spiritual experience of truth on a high plane, neither purely Subjective nor objective. It transcends both categories and it is really an integrated experience beyond formal description.

-Sri. C.P. Ramsawmi Aiyar.

ह्या ठिकाणी कुणालाही हा प्रश्न, स्वाभाविकपणे, पडेल की हा लेखक संस्कृतीच्या अभ्यासात नाथपंथीय ज्ञानपद्धती व विश्वनिर्मितीचे योगिक दर्शन ह्यांचा विचार कां मांडत आहे.

### संस्कृतीचे खरे भागीदार

खरोखरी संस्कृती ह्या विषयाबद्दल अभ्यास करतांना असे आढळले की निरनिराळ्या संस्कृत्यांची रसभरित वर्णने ह्याखेरीज आपल्याला कोणत्याच मूलभूत संकल्पना हाताशी लागल्या नाहीत. ह्याचे कारण संस्कृतीच्या उगमात, विस्तारात अभिव्यक्तित ज्या गोष्टींचे हातभार लागतात व संबंध जीवनाची रचना, मर्यादा व सामर्थ्य-शिवाय, त्यांत मानवाची, निसर्गाची व वैश्विक अदृश्य, अव्यक्त शक्तिची, काय कामगिरी असते, त्याबद्दल काहीही विचार झालेला दिसत नाही.

भारतीय संस्कृतीच्या धारेत या सर्व गोष्टींची पुरेपुर यथार्थ जाणीव अंतःभूत आहे. हे आपण सविस्तरपणे पुढे पाहूंच. पण, त्यांतही योगिक दृष्टिकोनातून हा संस्कृतीचा व्यापार संचार, अभिव्यक्ति, अविष्कार कसा होतो-त्यांत कोण कसे व कोणत्या प्रमाणात भागीदार असतात, याचे खास भारतीय योगिक वैशिष्ट्यपूर्ण दर्शन ह्या योग महर्षींनी घडवले आहे.

नाथ संप्रदायाचे ज्ञान असे दर्शवीते कीं हे दृश्य जग, संकल्पना किंवा बीज स्वरुपांत, एका अव्यक्त जगांत अगोदरच पूर्णपणे व 'सत्यस्थितीत' अस्तित्वात असते. आपणाला आढळणारे व प्रत्ययास येणारे 'व्यक्त जग' हे एका स्पिरीच्यूअल शक्तिच्या प्रभावाने एका भेदा-अभेद पद्धतिने, कालबद्ध जीवनाच्या स्वरुपांत ह्या विश्वात व विशेषतः ह्या पृथ्वीवर मानव, निसर्ग, प्राणीसृष्टी व इतर जड सृष्टीच्या स्वरूपांत व मर्यादेत अविष्कार पावते.

### मानव एक घटक - अभ्यास

मानवापुरते बोलायचे झाल्यास, त्याच्या पिंडाची रचना अशी आहे की तिथे ब्रह्मांड (सर्व विश्व स्वरुप,) मर्यादित स्वरुपांत अस्तित्वांत आहे. 'पिंडी ते ब्रह्मांडी' या वचनाचा एक अर्थ की ह्या पिंडाला एका निसर्गनिर्मीत नियमातून प्रवास करावयाचा आहे व एका काल मर्यादेतच. ह्या पिंडात जे स्वातंत्र्य आहे. 'सृजनशक्तिचे' त्याला पूर्ण वाव आहे. पण, एका वैश्विक नीतितत्वावर व त्याचेच पारंपारिक नांव धर्म-'सनातन धर्म' असे आहे. ह्या सृजनशक्तिच्या अविष्कारात Aesthetics रस निर्मीती होते ती ह्या स्पिरीच्यूअल 'आनंद' ह्या संकल्पनेच्या किंवा शक्तिच्या आणि व्याप्तिच्या व संकल्पनेच्या आराखड्यावर आधारूनच!

ह्या विश्वाच्या बीजात्मक संकल्पनेचे जे वर्णन सत्-चित्-आनंद असे आपण वारंवार वैदिक तत्त्वज्ञानी मंडळींकडून ऐकतो, त्याचा आधार हे 'दर्शन' आहे. ह्या संबंध दर्शनाला 'सत्-कार्य-वाद' असे संबोधण्यात येते.

## मानवी भागीदारीच्या खऱ्या मर्यादा

हे असे अत्यंत त्रोटक पण आवश्यक वर्णन अश्या साठी केले की, 'संस्कृतीच्या अविष्काराचा व सगळ्याच व्यापाराच्या मर्यादा, रचना, व्यक्ति आणि स्वातंत्र्य व जबाबदाऱ्या लक्षात याव्या. संस्कृतीच्या अविष्काराचा कर्ता कोण केवळ मानव की वैश्विक शक्ति (चैतन्य) की दोन्हीही?

बुद्धीबळाच्या पटाला ८ x ८ असे ६४ चौकोन आहेत व प्यादी, मोहरे, वजीर याच्या चाली निबद्ध आहेत. मग बुद्धीबळाच्या ग्रॅन्ड मास्टर्सच्या अविष्कारांना, स्वातंत्र्याला, रचनेला, डावपेचांना कांही उणीवा भासतात कां? नाही.

तसेच, निसर्गाच्या ह्या मर्यादा मानवाला बंदिस्त किंवा अकार्यक्षम करत नाहीत. उलट सुयोग्य असे 'क्षेत्र' उपलब्ध करून देतात. ह्याची जाणीव भारतीय संस्कृतीला आहे. क्षेत्र, पट, मोहरी, प्यादी त्यांच्या चाली आखून दिल्या ज्यांनी दिले त्यांचे काही कर्तृत्व मनावयाचे की नाही? आपली अहंकारी वृत्ती काय सांगते?

पृथ्वीवरील जीवनसृष्टीत मानवाला जर सांस्कृतीक नेता मानले, तर त्याच्याही वाटचालींना आरंभीच्या बिंदू हा एक 'प्राणी वृत्ती' हाच होता. आहार, निद्रा, भय, मैथून, एव्हढीच त्याच्या जीवनाची व्याप्ति होती. मग तुलनेने आज त्याच्या सांस्कृतीक धनामध्ये जे वैपूल्य दिसते ती भर कशी पडली, कां पडली, त्याची 'दिशा' कोणती, वगैरेचा शोध घेणे प्रस्तुत ठरेल. पिट्रीम सोरोकिन म्हणतात त्याप्रमाणे, जरी मानवालाच याचे दर्शनी श्रेय मिळालेले दिसले, तरी त्या प्रत्येक प्रेरणेच्या मागे कांही निसर्गनिर्मीत शास्त्र, दिशा, प्रेरणा आहेत असे मानावे लागेल. शिवाय या प्रत्येक सांस्कृतीक धनातील भर हा 'इंट्यूटिव्ह' अंतर्ज्ञानी प्रेरणेवर आधारलेला दिसेल.

## मानवी अहंकार व भ्रम

पण, दुर्दैवाने वस्तुस्थिती अशी आहे कीं माणूस आपल्या अहंकारी वृत्तीमुळे सगळ्या सांस्कृतिक धनाचे श्रेय फक्त केवळ 'स्वतःच्या वैयक्तिक अस्तित्वाला' बहाल करत असतो. त्यांत कांही वैश्विक प्रेरणा, योजना, उद्दिष्ट असूं शकेल ह्याचे त्याला मुतराम भान नसते. पण, भारतीय संस्कृतीची खरी जाण असणारे कलाकार, शास्त्रज्ञ, संगीतकार, साहित्यिक, तत्त्वज्ञानी, राजे, महाराजे, समाजशास्त्रज्ञ हे विनयशील दिसतील व आपल्या कर्तबगारीचे श्रेय ते ईश्वराला, निसर्गाला, विश्व नियंतांला देताना आढळतील.

इथे मी जो प्रश्न उभा करतो आहे तो महत्वाचा आहे. संस्कृतीच्या उभारणीत व स्वरूपांत मानवाचा किती श्रेयभार आहे. मग दूसरा 'पार्टनर' कोण आहे. पार्टनर आहे की 'मास्टर' आहे? स्वच्छ उत्तर आहे 'ईश्वर' किंवा 'सुप्रीम कॉशसनेस' जो वैश्विक स्वरूपाचा आहे. त्याने नांव कांहीही ठेवा. सृष्टीच्या, विश्वाच्या, निसर्गाच्या व मानवाच्याही निर्मीतीचे श्रेय ज्या शक्तीला जाते ती 'आदिशक्ति' हिचा सहभाग किंवा आधार व दिशा कोण नाकारूं शकेल?

## मानवी सृजनशक्तिचे स्वातंत्र्य

फार पूर्वी मुंबईच्या रुईया कॉलेजमध्ये 'सायन्स एक्झिबिशन' योजले जावयाचे. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मध्येही दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कारागिरीचे मोठे प्रदर्शन भरते. बंगलोरला सायन्स एक्झिबिशन हे मोठ्या वस्तूमध्ये कायमच भरवलेले आहे. ह्या संस्थांमध्ये नवनवीन प्रयोग, स्वरूपे, आर्ट फॉमस् वगैरे मांडले जातात. पण, त्या मागे त्या त्या कॉलेजच्या प्रोफेसरस्चा हात असतो की नाही. कोणत्या स्वरूपात या ज्ञानदानाच्या स्वरूपात आणि त्याच्याही मागे न्यूटन, आईनस्टाईन, मायकेल अँजेलो, वगैरे मास्टर्सच्या प्रेरणा वा दिशा असतात की नाही? पण, म्हणून काय विद्यार्थ्यांकडून कांहीच नवे प्रयोग नसतात

किंवा होणार नाहीत? मुख्य म्हणजे मूळ ज्ञानाचा स्रोत योग्य मार्गाने प्रसार पावतो की नाही? त्या मध्ये प्रयोग स्वातंत्र्य आहे. मूळ बीजात्मक ज्ञानही आहे. नाही कां? अगदी तसेच ह्या पृथ्वीवरल्या संस्कृतीच्या उगमाची, विस्ताराची व संकल्पनेची 'स्टोरी' आहे. त्यांत भौतिकवाद्यांचा अहंकार का मधे यावा व तो योग्य आहे कां?

## अरविंद घोष यांचे भाष्य

ह्या विषयावर महायोगी अरविंद काय म्हणतात हे पहाणे कुतुहलाचे व सुयोग्य ठरेल. आपल्या सांस्कृतीक मूल्यांबद्दल ते काय म्हणतात-

"Our action arises, as we ourselves have emerged, out of a universality of which we are not aware; we give it a shape by our personal temperament, personal mind and will of thought or force of impulse or desire; but the true truth of things, the true law of action exceeds these personal and human formations. Every standpoint, every man made rule of action which ignores 'the indivisible totality' of 'the cosmic movement', whatever its utility in external practice, ism the eye of 'Spiritual Truth' an imperfect view and law of ignorance".

## संस्कृतीचे संक्रमण

थोडक्यात म्हणजे संस्कृतीच्या आजच्या स्वरूपाला निदान भारतीय संस्कृतीला जवळ जवळ १०,००० वर्षे लागली. अनेक पिढ्यांमध्ये जन्माला आलेल्या जीवांनी या भारतभूमीवर गंगा, सिंधू, कावेरी, नर्मदा, गोदावरी, यमुना, शास्त्री वगैरे नद्यांच्या काठांवर या मानवी जीवनाच्या संदर्भात भर घातली व अनेक जीवनमूल्यांची, नैतिक तत्वांची, साहित्यकृती, कलाकृती यांची निर्मीती केली. ह्या सर्व संस्कृती संभाराचे श्रेय फक्त मानव समाजाला केवळ न देता येईल की त्यांत अदृश्य वैश्विक शक्तिचांही सिंहाचा वाटा आहे. शिवाय, इतर संस्कृत्यांच्या तुलनेने भारतीय संस्कृतीची वाटचाल एखाद्या विशिष्ट दिशेने होत आहे असे दिसते कां? अर्थातच ही वाटचाल न अडखळतां अत्यंत सोपी, सुलभ होणे अशक्यच आहे, कारण ती प्रत्यक्ष मानवाच्या कॉंशसनेसच्या गुणवत्तेप्रमाणे होणारे हे उघड आहे. मग याचा अर्थ मानवाची ह्या कॉंशसनेसच्या गुणातही प्रगती होत आहे, झाली आहे. ही वाढ मग एका पिढीपुरतीच मर्यादित राहिली तर तिच्यात सांस्कृतिक संक्रमण पुढच्या पिढीपर्यंत कसे होणार. ह्याचा साधा अर्थ नवनिर्मित संस्काराची जपणूक जुन्या पिढीतून नवीन पिढीकडे संक्रमित व्हावयाला हवी. तेव्हा संस्कारांची वाटचाल एका नियमबद्ध करण्याची जबाबदारी त्या संस्कृती (Civilisation) वर येऊन पडते. थोड्याश्या कल्पनाशक्तीचे ह्या व्यवहाराला पुनर्जन्म व जन्मजन्मांतरी संस्काराचा प्रवास, नवनवीन जीवांना भारतभूमीवर जन्माला आल्यास, व्हावा लागेल. ह्यासाठी काही विशिष्ट शिक्षण पद्धती, साधने, संस्कार करण्याची 'टेक्नॉलॉजी' ही आवश्यक ठरावी.

भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य हे आहे की ती अव्यक्त जगातील शक्तींचा हातभार गृहीत धरते, बीज संकल्पना देखील मानते व जाणण्याचा प्रयत्न करते. ह्या अव्यक्त जगाशी जोडून ह्या संस्कृतीचा विस्तार करण्याची अतींद्रिय साधने, तंत्र, मंत्र, यंत्र, योगिक क्रिया 'समाधिजन्य ज्ञान' ह्यांची पूर्ण तयारी पूर्वीच मिळवून ठेवली आहे व जतन करण्यासाठी हा भारतीय समाज कटिबंध होता. आसूरी आक्रमक शक्तींना जरी ह्यांत विध्वंसकाची भूमिका वठवली असली व आपल्या आसूरी व परकीय, परजातीय संकल्पना बळजबरीने लादण्याचा प्रयत्न केला असला, तरी इतिहासांत त्याचा प्रतिकार केला व चालू आहे. शिवाय ह्या भूमीवर जन्मलेल्या प्रत्येक 'जाति जीवाला' ही 'पिंडी' व 'विराट' यांची जाणीव आहे. तेव्हा पुनर्निर्मिती शक्य आहे.

### परकीय प्रभाव

मूळ भारतीय संस्कृतीला इतर परकीय संस्कृतीच्या आक्रमणाला तोंड द्यावे लागेल. राजसत्ता ही मुसलमानी, ब्रिटीश व थोड्या प्रमाणात फ्रेंच व पोर्तुगीज (पॉडिचरी, गोवा वगैरे) ह्या देशांच्या व परकीय सत्तेच्या अंमलात, राज्यकर्त्यांनी आपल्या संस्कृतीचा पगडा ह्या देशातील समाजावर बसेल, याचा जोरदार प्रयत्न केला. कित्येक वेळा, बलात्कारानेही, अशी व्यवस्था केली. त्यामुळे, संगीत, नृत्य, सामाजिक रीतिरिवाज, शिक्षण व सर्व जीवन व्यवहाराच त्यांच्या संस्कृतीची बांधला गेला. नवीन पिढ्या ह्या भेसळ व परकीय संस्कृतीत पोसल्या गेल्या व ह्या नवीन पिढ्यातील बुद्धीमान वर्गाला विकत घेतल्यामुळे स्वत्वाचे विस्मरण झाले व त्यांच्या मार्फत ह्या नवीन राज्यकर्त्यांनी समाजाचा बुद्धीभेद केला. सर्वात महत्वाचे म्हणजे 'भारतीय संस्कृती' बद्दल भ्रम, अनादर व अज्ञान, पूर्वग्रह लादण्यात ते यशस्वी झाले.

त्यामुळे, भारतीय संस्कृतीचे स्वरूप पार बदलून ती परकीय वेषात सजून, थटून बसण्यात धन्य झाली. स्वतःच्या जीवनउद्दिष्टांबद्दल जे 'चिरंतन' सत्य संस्कृतीमार्फत ज्ञात व्हावयाचे, ती क्रियाच खंडित झाली. आत्मविश्वास ढळला. तरी जीवन चालू आहे व तिची विस्कळीत स्वरूपात वाटचाल चालू आहे.

### संस्कृतीच्या उंचीचे ज्ञानेश्वरी प्रमाण

महत्वाचा प्रश्न हा आहे कीं ही संस्कृतीची वाटचाल कशी व कोठल्या दिशेने होत आहे? तिच्या वाटचालींची उद्दिष्टे काय आहेत? तिची मूळ संकल्पना व बीज काय आहे? त्या मूळ प्रेरणांशी ही वाटचाल सुसंबद्ध आहे कीं, फारकत झाली आहे? फारकत व्हा कां - केव्हां, कोणाच्या सांस्कृतीक मूल्यांच्या जबाबदारीवर? त्याकरिता मानव व मानव समाज 'पूर्णत्वाला' पोचला आहे कां?

ज्ञानेश्वरांच्या 'पसायदानात' जी मागणी जगन्नियंतापाशी आहे, तिची उंची सर्वसाधारण माणसाने गांठली आहे का?

*''खळांची व्यंकटी सांडो-तयां सत्कर्मी रती वाढो*

*भूतां परस्पर पडो-मैत्र जीवांचे ॥*

*दुरितांचे तिमीर जावो-विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।*

*जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ॥''*

### आदर्शांचा प्रभाव नाही - कां?

दुःख नाहीशी होवोत. गौतम बुद्धाने प्रार्थना केली. फळास आली कां? संतानी जीवांची मैत्री वाढावी म्हणून भगवंतापाशी, विठ्ठलापाशी साकडे घातले. साम्यवादामध्ये, कम्युनिझममध्ये कार्ल मार्क्स यानेही, 'जो जे वांछील तो ते लाहो' - संबंध प्राणिजाते. तरी काहीही साध्य झालेले दिसत नाही. कां? असे पराभव मानवी संस्कृतीला कां यावेत?


ह्याचे एक मुख्य कारण म्हणजे संस्कृतीची मूल्ये व त्याची उंची वाढवण्याकरिता, संस्कृतीचा 'घटक' जो मानव त्याच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच्यावर जे बेसिक पायामूलक संस्कार व्हावे लागतात, त्या शिक्षणपद्धतीचे उच्चाटन करण्यांत आले आहे. कुटुंब, शिक्षणसंस्था, समाज ह्यामध्ये ज्या पद्धती बाणवल्या होत्या त्याबद्दलची समज, जाण व आवश्यकता नाहीशी झाली आहे.

### वैश्विक अग्निची कामगिरी

ऋग्वेदामध्ये जी अनेक अग्निसूक्ते आहेत तो 'अग्नि' हा 'वैदिक अग्नि' आहे. तो अव्यक्तातून आवाहन केल्यावर प्रकट होतो. १६ संस्कारामध्ये प्रत्येक संस्कारात त्या संस्काराला अनुकूल असा नवा एक विशिष्ट 'अग्नि' हे

संस्कार दृढ करत असतो व त्याची म्हणजे मानवाची सांस्कृतिक उंची वाढवण्याकरितां एका विशिष्ट पद्धतिने व मुहूर्तावर (Process of Cosmic Time) ही पद्धत योजिली होती. ह्या सबंध पद्धतिचे विस्मरण समाजाला झाले होते, ते स्वामी दयानंद यांनी करून दिले. पण, अजूनही तिकडे कोणाचेही लक्ष नाही आणि त्याच्या देखावी समारंभालाच 'संस्कार कृत्य' मानून खोटा व्यवहार चालला आहे. त्यांतील मंत्र शक्ति व वैश्विक शक्तिचे आवाहन व हातभार आज अनुस्युत नाही. खऱ्या अर्थाने ह्या क्रिया माहीत नाहीत.

### नैतिकरा व संस्कृतिचे पिरॅमिड




सोबत एक चित्र जोडले आहे. "Mahayogi Autobindo's Ethical Pyramid Spiritual Progress Hierarchy" माणसाच्या नैसर्गिक जन्मात तो अजूनही 'प्राणी' 'Animal Man' ह्याच स्थितीत असतो. त्याची जास्तीत जास्त भौतिक प्रगती 'सामाजिक माणूस' 'Social Animal' ह्या अवस्थेत होऊं शकते. पण, पुढचा खरा सात्विक प्रवास हा 'अग्नि' च्या मदतीने व वैश्विक शक्तिच्या अदृश्य सहाय्याने होऊन तो शेवटी Spiritual Man आणि Divine Consciousness' ह्या स्थितीपर्यंत जाऊ शकतो.

त्यामुळे ज्ञानेश्वरांची आध्यात्मिक स्पिरीच्यूअल संस्कृतीची प्रवृत्ती व उंची ही आजच्या सद्यस्थितीहून किती दूर उंचीवर आहे हे तुलनेने पहावे. म्हणजे ही वाटचाल किती दुर्धर, दुर्लभ व तप करण्याच्या आवश्यकतेची आहे हे उमगेल.

### Rebirth पुनर्जन्म

ज्ञानेश्वरांना ह्या छोट्या जीवनांत ही कां प्राप्त झाली व सहजपणे? ह्याचे एकच उत्तर की ही पूर्व जन्मीची ठेव होती.

पाश्चात्य जग व भौतिकवादी ज्या यंत्रणेला संस्कारक्षम मानतात त्या संस्कारांची संभावना 'कृत्रिम संस्कार' अशी श्री १०८ सोंवारी महाराज ह्यांनी केली आहे ('दैशिक शास्त्र'). त्याचे मुख्य कारण म्हणजे हे संस्कार ज्या वैदिक पद्धतिने दृढ व्हावयाला हवेत, तसे न झाल्याने त्यांचा, 'जीवाला' पुढच्या जन्मात, कांही लाभ उठविता येत नाही. संस्कारात 'उर्ध्व गती' कठीण आहे, 'अधःपात' सहज आहे. हा 'अग्नि' व 'जल' या दोन तत्त्वांतील फरक आहे. लोखंडाला जेव्हा 'हार्डनिंग' 'Hardining' प्रोसेस करतात, तेव्हां ते तापून गरम होऊन तेजस्वी पांढरे दिसेपर्यंत तापवून नंतर पाण्यात बुडवतात, हे कुठलाही लोहार सांगेल. मग मानवाच्या चित्तावरही असा दृढ संस्कार व्हावा लागतो. त्याची जाण आज समाजाला नाही.

### Rawlsion Equity

'Rawlsion Equity' म्हणजे जॉन रॉल्स म्हणतात, त्याप्रमाणे आजकालच्या असंगत होणाऱ्या पिढीला समाजाची पुढच्या पिढीची जबाबदारी खऱ्या अर्थाने अनावश्यक वाटते व त्यामुळे हलगर्जी होते आहे. पिढीपिढीमधील कर्तव्याची, जबाबदारीची जाणीव ही पुनर्जन्म न मानणाऱ्यांना का बरे व्हावी, नाही का?

मानवी समाजावर उच्च सात्विक मूल्यांचा संस्कार करण्याची भारतीय संस्कृतीची मूलभूत भूमिका ही 'Integral' तत्त्वाची आहे. म्हणजे त्यात मानवी संकल्पना, प्रयत्न व

प्रत्यक्ष पद्धत ही भौतिक व आध्यात्मिक दोन्ही पातळीवर योजिली जाते. अदृश्य, अव्यक्त जगांतील वैश्विक शक्तिचा, विशेषतः 'वैश्विक' 'अग्नि' तत्वाचा आधार व मदत ह्या संपूर्ण क्रियेला होते. त्याचे जास्त सविस्तर वर्णन आपण करुंच.

पण, केवळ 'अहंकारी' मानवी प्रयत्न (निरीश्वरवादी, एकांगी भौतिकवादी, भौतिक विज्ञानवादी प्रयत्न कसे अपुरे तोकडे पडतात व त्यांत सर्वनाश कसा होतो ते योगी अरविंद यांच्या शब्दांत बघू या.

"This is man's normal attitude towards his environment, actually false, because our ego and its will are creations and puppet of the cosmic forces; and it is only when we withdraws from ego into the consciousness of the divine knowledge will of the eternal who acts in them, that we can be by a sort of deputation from above their master"

### पुढील अभ्यास

अश्या तऱ्हेच्या निरीश्वरवादी, पूर्णपणे एकांगी भौतिक व मानवी मनाच्या अहंकारी भूमिकेतून झालेला सामाजिक प्रयत्न म्हणजे, ''चायनीज्, कल्चरल रेव्होल्यूशन'' (१९६६ ते १९७६ - पूर्ण १० वर्षे)

ह्या CR (कल्चरल रेव्होल्यूशन) १० वर्षांच्या सांस्कृतिक क्रांतीच्या काळात कमीत कमी ३० लाख लोक माओ व त्याची पत्नी जिऑंग क्विंग आणि 'गँग ऑफ फोर' ह्यांच्या प्रोलेटेरियन सांस्कृतिक क्रांतिच्या प्रयोगात मृत्यूमुखी पडली. माओच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेल्या नेत्यांच्या अंदाजात कमीत कमी १००० लाख चिनी नागरिक ह्या प्रयोगांत उध्वस्त झाले.

काय होती ही सांस्कृतिक बदलाची (मानव निर्मित) संकल्पना? आणि कां झाला या प्रयोगाचा पराभव?

अशा तऱ्हेचा आणखी एक बदल अॅडॉल्फ हिटलर याने 'Master Race' निर्माण करण्यात योजिल्या होत्या. त्यांतही कित्येक लाख 'ज्यू' ह्यांना गॅस चेंबर्समध्ये कोंडून, ढकलून मारण्यात आले. ह्या विलक्षण प्रयोगाच्या संकल्पनेचे श्रेय 'थोर पुढारी' 'हिटलर' व 'तत्त्वज्ञानी फ्रेड्रिक नित्शे' यांना जाते. ह्या आसूरी प्रयोगाचे एकांगी अहंकारी मानवी प्रयोग व त्याचे विश्लेषण पुढच्या दिशाच्या अंकात करू या.

(क्रमशः)

**यशवंत साने**

(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@eth.net



# मुंबई ते हर्णे पदयात्रा - एक रोमांचक अनुभव


*श्री. सुरेंद्र लागू यांनी निवृत्तीनंतर पदयात्रेचे जे अनुभव घेतले ते खरोखरच अनोखे आहेत. हर्णेपर्यंतच्या पदयात्रेचे वर्णन या लेखात केले आहे. - संपादक*

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज महाराजांच्या पादुका अखंड नामसंकीर्तन आणि भजनाद्वारे एकनाथ षष्ठीचे औचित्य साधून येथील श्री देव एकनाथ मंदिरात सातत्याने गेली १९ वर्षे जात असून यंदा दिंडीचे २०वे वर्ष होते. आपणही या संधीचा लाभ आणि आनंद घ्यावा या उद्देशाने या पदयात्रेत जाण्याचे ठरविले. गतवर्षी आळंदी ते पंढरपूर ही २३५ किलोमीटरची पदयात्रा आठ दिवसात तर ठाणे ते शिर्डी ही २४० किलो मीटर अंतराची पदयात्रा आठच दिवसात पूर्ण केल्याचा अनुभव आणि आत्मविश्वास पाठीशी होता आणि म्हणूनच काहीशा कठीण असणाऱ्या या दिंडीसाठी जाण्याचं ठरविले. ईश्वरकृपा, प्रयत्न, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर ही पदयात्रा देखील यशस्वीपणे पूर्ण करू शकलो.

दिंडी म्हणजे काय? हे सांगताना साकोरीचे श्री. उपासनी महाराज म्हणतात, 'देवा आम्ही तुझ्याकडे कष्ट, हाल सोसून तुझे नामस्मरण करीत पायी आलो आहोत. तू तर पुण्यराशीच आहेस, तर त्यातील थोडा पुण्याचा भाग आमच्या पदरात टाक व आम्हाला कृतार्थ कर असे देवाला गर्जून सांगणे अशासाठी दिंडी काढावयाची असते. शरीर, जीव व मनाला त्रास सोसायला चालण्यास ताकद यावी म्हणून तेवढ्यापुरतेच जे मिळेल ते खावे. बाकी सर्व वेळ पुण्यकर्मात घालवावा.' याची प्रचिती आली. मात्र इच्छित स्थळी पोहोचल्याचा आनंद वर्णनातीत आहे. दिंडीमध्ये सातत्य आलं म्हणजे ती झाली वारी. अॅथलेटिक्सच्या खेळप्रकारात ५०००, १०,००० मीटर्स अशासारख्या लांब पल्ल्याच्या धावण्याच्या स्पर्धा असतात. हे अंतर सरळ धावायचे असते त्यात कोणतेही अडथळे नसतात. यामध्येच ३००० मीटर्सची वरील अंतराच्या मानाने कमी अंतराची असलेली अडथळ्यांची शर्यत असते. मात्र यामध्ये धावपटूला ११० हर्डल्स (अडथळे), पाण्यातून आणि सरळ धावपट्टीवरून धावायचे असते. त्यामध्ये धावपटूची क्षमता आणि कसब लक्षात येते. वरील पदयात्रा याचा सुधारित प्रकार आहे असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. सरळरस्ते, घाटरस्ते, खाडीतून, जंगलातून, वाळूतून किंबहुना काही ठिकाणी चिखलांतूनही पदयात्रींना जावे लागते.

महाराष्ट्राला दिंडीची अतिशय उज्ज्वल आणि थोर अशी जुनी परंपरा आहे. शेकडो वर्षे दर आषाढी - कार्तिकी एकादशीला पांडुरंगाच्या दर्शनासाठी हजारो, लाखोंच्या संख्येने भक्तमंडळी पंढरपूरला जात आहेत. अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, मोरगावचे मोरया गोसावी, गोंदवल्याचे गोंदवलेकर महाराज या आणि अशा सारख्या अनेक दिंड्या महाराष्ट्रात प्रचलित आहेत. मात्र या सर्व दिंड्यांचा मार्ग सुकर आहेत. मात्र यातील एकही दिंडी कोकणातील नाही.अथवा कोकणात जातही नाही. त्यामुळे अर्थातच वळणावळणाचे घाट, चढ-उताराचे, गर्द झाडींतून जाणारे, आव्हान देणारे मार्ग या दिंड्यातून अभावानेच आढळून येतात.

ही रुखरुख आणि बोच सध्या डोंबिवली येथे रहात असलेले मात्र मूळचे हर्णे रहिवाशी असलेले श्री. एकनाथ महाराजांचे भक्त आणि एकनाथ देवस्थानचे अध्यक्ष असलेले श्री. यशवंत शंकर मेहेंदळे यांचे मनात होती. त्या दृष्टीने विचार करता त्यांना एक अभिनव आणि



आगळ्या वेगळ्या दिंडीची संकल्पना सुचली. त्यांनी ती आपल्या मित्रमंडळींना सांगितली. त्यांना देखील ती अतिशय आवडली व योजनेचे सर्वांनी स्वागत केले. अर्थात ती योजना म्हणजे लेखाचे शीर्षक असलेली 'मुंबई ते हर्णे दिंडी-पदयात्रा' ही होय. पदयात्रेचा संपूर्ण मार्ग केवळ कोकणातीलच असून विशेष म्हणजे पूर्णपणे सागरी किनाऱ्याने आणि पदयात्रींना आव्हानात्मक वाटावा असाच आहे. मुंबई (भाऊचा धक्का) ते रेवस (लॉंचने) - अलिबाग-रेवदंडा-मुरुड जंजिरा-दिवे आगर-बावे-श्रीवर्धन-हरिहरेश्वर-वेळास-केळशी-आंजर्ले- आणि एकनाथ मंदीर हर्णे असा तो आहे. त्यामुळे पदयात्रा मुंबई-ठाणे-रायगड आणि रत्नागिरी अशा चारही सागरी जिल्ह्यांतून जाते.

महाराष्ट्राच्या पाच संत शिरोमणिमध्ये संत श्रेष्ठ एकनाथ महाराजांचे विशेष स्थान आहे. ''शब्दाहून आचार मोठा'' असेलेले संत श्रेष्ठ एकनाथ केवळ महाराष्ट्राचे नव्हेत तर अवघ्या मानव संस्कृतीचे लखलखीत अलंकार आहेत. नाथांच्या चरित्रात आणि चारित्र्यात काय आहे, यापेक्षा काय नाही असाच प्रश्न पडतो. नाथ म्हणजे शांतीदयेचा पुतळा आणि सौजन्याची कळा! ज्ञानाचा एका हे सार्थ बिरुद मिरविणारा सर्वोत्तम मार्गदर्शक, अवघ्या गृहस्थाश्रमी साधकांचा दीपस्तंभ आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत समाजाचे सत्व राखणारा श्रेष्ठ सत्वधर! नाथांचे चरित्र अवघ्या मानवजातीला आदर्शभूत आहे. नाथ झाले नसते तर कदाचित महाराष्ट्र संस्कृतीच लयाला गेली असती. एका बाजूला ज्ञानदेव, नामदेव आणि दुसऱ्या बाजूला रामदास, तुकाराम या संत परंपरेला जोडणारा अध्यात्म चैतन्याचा निरंजन सेतू म्हणजे संत श्रेष्ठ एकनाथ महाराज! असे मौलिक विचार संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, विद्यावाचस्पती डॉ. शंकर अभ्यंकर यांनी मांडले आहेत. अशा या अलौकिक संताच्या पादुकांचा ठेवा. हर्णे ग्रामवासियांना अत्यंत सहजपणे मिळाला आहे. श्री तीर्थक्षेत्र पैठणनंतर आपले द्वितीय निवासस्थान अशी योजना नाथांनी केली होती. खरोखरच हर्णे ग्रामस्थांचे परम भाग्यच आहे. 'पूर्व पुण्याई फळा आली, प्रत्यक्ष गंगामाई द्वारी अवतरली' हा खरोखरच महान योग म्हणावा लागेल. वारी करण्यामागे हा देखील उद्देश होता.

पदयात्रेचा मार्ग बघितला तर अंगावर रोमांच उभे राहतात. मन प्रफुल्लीत आणि आकर्षित होते. कोकणातील घाट वळणाचे, चढउताराचे, गर्द झाडीतून जाणारे रस्ते आणि पदयात्रींना आव्हानात्मक असलेला मार्ग होता. एकूण प्रवास अक्षी, दिघी, वेळास, बागमांडला, बाणकोट, अंजर्ला अशा सारख्या एकूण आठ खाड्या पदयात्रींना पार कराव्या लागतात. त्यातील दोन ते तीन गुडघाभर पाणी असलेल्या, काही छोट्या होड्यातून, तर काही मचव्यातून पार कराव्या लागतात. त्याचा काही वेगळा अनुभव आणि आनंद आहे तो ज्याचा त्यांनी घ्यावयाचा आहे. 'काश्मीरला भारताचे नंदनवन' समजतात. तर 'केरळला दक्षिण काश्मीर' म्हणतात. तद्वतच 'कोकणला भारताचा कॅलिफोर्निया' असे का म्हणतात, याची प्रचिती आली. सबंध पदयात्रेत एका बाजूला अथांग सुंदर सागर किनारा, त्याच फेसाळणारं पाणी, धीर गंभीर आवाज, सूर्योदय-सूर्यास्ताचे वेळी सागराच्या क्षितिजावर लालबुंद दिसणारं सूर्यबिंब निळ्याशार समुद्राच्या पाण्यावर पसरलेली लाल-तांबूस, गुलाबी रंगाची उधळण करणाऱ्या सूर्याची किरणे पाहून मन प्रसन्न होते. तर दुसऱ्या बाजूला नारळी-पोफळीच्या हिरव्यागार बागा, त्यामध्ये असलेली केळी, फणस, कोकम, आवळे क्वचित प्रसंगी मिरीची वेल, जायफळाची झाडे लावलेल्या असंख्य वाड्या ज्याला

हल्लीच्या भाषेत फार्महाऊस म्हणतात. आंब्याची वनराई आणि त्या हिरव्या झाडीत असलेली कौलारु घरे, त्यापुढे सारवलेली सुरेख अंगणी, तुळशी वृंदावन, अंगणात टांगलेले झोपाळे, त्यावर असलेले पत्र्यांचे मोठे मांडव-सुपारी वाळत घालण्यासाठी केलेले-अतिशय सुखकर वाटणारे गावाचे स्वरुप, साथीला सह्याद्रीचे छोटे छोटे डोंगर, अलिबाग, कोर्लाई, रेवदंडा, जंजिरा, सुवर्णदुर्ग असे सागरी दुर्ग हे सर्व मानसिक समाधान व आनंद देतात. पदयात्रेचे दिवस पौर्णिमेचे असल्यामुळे आणि दोन दिवस-रात्रीचा व रोज पहाटेचा प्रवास असल्यामुळे माड-पोफळींच्या शेंड्यामधून पाझरणारा चंद्रप्रकाश, टिपूर चांदण हे सर्व मन मोहीत करुन टाकते. पहाटेच्या शांत आणि थंड वातावरणात केलेला प्रवास अतिशय सुखकर होता. पक्षांचा किलबिलाट, विविध जातींचे पक्षी, माळरानात गुरांना चरावयास नेणारा गुराखी सारं काही मन प्रसन्न करणारं.

एकूणच कोकणच्या परिसरात वर्णन कराव तेवढे अपुरेच आहे. पदयात्रेचा एकूण मार्ग १६५ ते १७० किलोमीटरचा असून ते अंतर सहा दिवसांत पूर्ण करावयाचे असल्याने दिवसाला सरासरी २५ ते ३०किलोमीटरचा प्रवास करावा लागत असे. आणि तो देखील आपलं दैनंदिन लागणारं सामान, कपडे, आंथरुण-पांघरुण बरोबर घेऊन. त्यामुळे माझ्या सारख्या नव्या पदयात्रीला ते आव्हानच होते. मजकडे साडेसहा किलोचे सामान होते. पदयात्रेत एकूण पासष्ट यात्री सहभागी झाले होते. त्यातील आठ भगिनी होत्या तर पाच ते सहा प्रवासी सत्तरीच्या पुढे होते. सांगण्यास अभिमान वाटतो की तीन ते चार पुरुष पदयात्री आणि चार भगिनी पदयात्री वगळता बाकी सर्वांनी ही पदयात्रा निर्धोकपणे पार पाडली. वास्तविक मार्च महिन्याच्या कडक उन्हाळ्याची सुरुवात झाली होती. बहुतेक दिवशी दुपारच्या भोजनानंतरही प्रवास होता परंतु अपवादात्मक पदयात्री वगळता कुणाला कसालाही त्रास झाला नाही. मात्र काही पदयात्रींच्या पायाला टपोरे फोड आले होते. काहींचे गुडघे, पाय दुखत होते, काही अनवाणी चालत होते. परंतु त्यांनी आपली मार्गक्रमणा थांबविली नाही. नेटाने ती पूर्ण केली. यामागे पदयात्रींचा निग्रह, आत्मविश्वास, चिकाटी आणि जिद्द लक्षात येते. 'केल्याने होत आहे रे! आधी केलेची पाहिजे!!' या समर्थवचनाची आठवण होते. या ठिकाणी मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की अनेक पदयात्रींची एकाहून अधिक वेळा ही पदयात्रा करण्याची वेळ होती. काहींची पाच, सात, दहा, बारा, किंबहुना मेहंदळे बंधू, गोडबोले, गोळे, पुंडे, साठे, कशेळकर, केळकर गुरुजी इत्यादींची त्याहूनही अधिक वेळा पदयात्रा करण्याची वेळ होती. ही सर्व मंडळी कौतुकास, धन्यवादास आणि अभिनंदनास पात्र आहेत. वीस वर्षापूर्वी रस्ते, भौगोलिक परिस्थिती, दळणवळणाच्या सोयी इत्यादी फारच कठीण होत्या. त्यामानाने आता बऱ्याच सोयी आणि सुधारणा झाल्या असल्याचे श्री. मेहंदळे यांजकडून समजले.

पदयात्रेचे यंदाचे विसावे वर्ष होते. प्रत्येक ठिकाणांच्या यजमानांकडे श्री. मेहंदळे यांनी आवश्यक तो संपर्क साधला होता. त्यामुळे पदयात्रींची कुठेही कसलीही गैरसोय अथवा अडचण झाली नाही. सर्व ठिकाणी यजमान आणि ग्रामस्थांनी पादुकांच आणि पदयात्रींच आनंदाने आणि उत्स्फूर्तपणे स्वागत केले. काही ठिकाणी गाववेशीपासून मुक्कामापर्यंत वाद्यवृंद, फटाके, रांगोळ्या घालून स्वागत केले. हर्णे वेशीपासून देवळाचं अंतर एखाद किलोमीटर असेल मात्र ते पार करण्यास दोन तासांचा कालावधी लागला. पादुकावाहक नाथांचे भक्त असलेले श्री. वझे यांना सुवासिनींनी ओवाळले. दूध, पाणी आणि हळद कुंकू लावून त्यांना मानाचं श्रीफळ दिले. आणि वाजत गाजत आणि आदर व श्रद्धापूर्वक भावनेने, पादुकांचे हस्तांतरण मंदिराच्या प्रमुख पुजाऱ्याकडे केले. आणि तेथून पुढे पादुकांची जबाबदारी हर्णे ग्रामस्थांनी घेतली. देवळापर्यंत पायघड्या घातल्या होत्या. पंधरा-पंधरा पदयात्रींची उतरण्याची, राहण्याची, झोपण्याची

व्यवस्था ग्रामस्थांनी अतिशय आनंदाने आणि मनःपूर्वक केली असल्याचे जाणवले. रात्री आफळेबुवांच्या कीर्तनाची मेजवानी भक्तांना होती. षष्ठीच्या दिवशी पदयात्रींना प्रसादाचं जेवण होत आणि पंक्तीत त्यांना अग्रक्रम होता. त्यांनी प्रसाद घेतल्याशिवाय गावांतील अन्य कोणीही प्रसाद सेवन करावयाचा नाही असा अलिखित नियम होता.

ग्रामस्थांचा सरळ मार्गी, भोळा -भावडा स्वभाव, कुठेही आत बाहेर नाही. त्यामुळे त्यांच्या स्वभावाला फणसा-नारळाची उपमा का देतात याचा पुनःश्च अनुभव घेतला. नकळत शहरवासीयांशी तुलाना करु लागलो. कुठेतरी संकोचल्यासारखे, अवघडल्यासारखे झाले. प्रभु रामचंद्राना शबरीने दिलेली बोरे गोड लागली, भगवान श्रीकृष्णाला सुदाम्याचे पोहे पंचपक्वान्नापेक्षा चविष्ट वाटले. पांडुरंगाला भक्ताने दिलेला प्रसाद अतिशय गोड वाटला. कारण त्यामध्ये होती आत्मीयता, प्रेमाचा ओलावा. उन्हातान्हातून आलेल्या, थकल्या-भागल्या पदयात्रींच गूळपाणी देऊन केलेले स्वागत आम्हांला अमृतासारखं लागत होतं. कांदे-बटाटे पोहे, दूध-गूळ, खोबर घालून केलेले पोहे, दडपे पोहे, भेळ, आंब्याचं पन्हं, कोकम सरबत, घरची कलिंगडं, गरम गरम वालाची पोपटी, फणसाची भाजी, घरच्या नारळाची-आंब्याची चटणी, शेवग्याच्या शेंगाच वरण, साखरभात, मोदक, झुणका भाकरी काय आणि किती वर्णन करू?

पंचगव्य सेवन करुन अतिशय शुद्ध आणि प्रसन्न चित्ताने पदयात्रेच्या आरंभ झाला. पदयात्रेचे वातावरण अतिशय धार्मिक आणि आध्यात्मिक होते. वाद-विवाद, राजकीय चर्चा, निरर्थक गप्पा याला मज्जाव होता. नाथांच्या अखंड नामस्मरणाने आणि गजराने पादुकांची वाटचाल चालू होती. मुक्कामाचे अथवा विसाव्याचे ठिकाणी भोवरी नृत्य, नामसंकीर्तन, भजन, पादुकांची पूजा, आरती होऊन मगच वारी मार्गस्थ होत असे. बाबा महाराज केळकर यांच्या कीर्तनाचा लाभ ग्रामस्थ आणि पदयात्रींनी घेतला. पदयात्रींना आपली भजन कला सादर करण्याची मुभा पूर्ण होती. पूर्ण पदयात्रेत नाथांची भारुड, अभंग, भक्तीगीत, गवळण, वासुदेव इत्यादी ऐकण्याचा योग आला. स्वतःला मी धन्य समजतो. श्री. खरे गुरुजी, भिडे मास्तर यांची इतकी भजने पाठ होती की खंड न पडता दीड-दोन तास पहाडी आणि सुंदर आवाजात ते भजने गात असत.

पदयात्रेचे फल स्वरुप काय? ती का करावी? त्याच प्रयोजन काय? असं विचारलं तर मी म्हणेन मनुष्य कितीही व्यक्ती व कुटुंब प्रिय असला, स्वतःपुरतच बघणारा असला तरी अशा पदयात्रेमुळे तो समाजाभिमुख होतो. जनसमुदायाबरोबर रहाण्याची, इतरांशी जुळवून घेण्याची, स्वावलंबनाची, सलोख्याची आणि दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती वाढीस लागते. श्री नाथांनी अशी प्रेरणा आणि परोपकारी वृत्ती सर्वांना द्यावी अशी प्रार्थना करतो.

माझे शेजारी व मित्र श्री. उपेंद्र गोखले व मुलुंडचे श्री. बापट यांनी दिंडीला येण्यासाठी मला प्रवृत्त केले म्हणून योग जुळून आला. त्याचबरोबर एकनाथ भक्त श्री. यशवंत शंकर मेहंदळे, राहणार डोंबिवली यांनी पदयात्रेत सामील होण्याची संधी दिली आणि ती देखील शंभर रुपये नाममात्र शुल्क घेऊन! त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. मेंहदळे यांचा अतिशय बोलका, विनोदी, सर्वांना सांभाळून घेण्याचा स्वभाव, आणि तडजोडीची वृत्ती त्यामुळे दिंडीत कुठेही तणाव निर्माण झाला नाही. त्यांच्या पदयात्रेचा रौप्य-सुवर्ण महोत्सव संपन्न होवो अशी श्री एकनाथचरणी प्रार्थना!

सुरेंद्र लागू
चरई, ठाणे
दूरध्वनी क्र. २५३४९३४१

•••

# गीतेच्या गाभाऱ्यात (भाग १ - २)

*न्यायमूर्ती राम केशव रानडे यांच्या 'गीतेच्या गाभाऱ्यात' वरील हा परिचयात्मक लेख. गीतेवरील ग्रंथांचे हे परिचय वाचकांना आवडतात व त्यामुळे या ग्रंथांना वाचक मिळतात हे या लेखांचे फलित. - संपादक*

भगवान श्रीकृष्णाचे रंगीत मोहक मुखपृष्ठ ही ह्या पुस्तकाची खासियत. 'प्रसाद' मासिकातून श्री. राम केशव रानडे ह्यांनी पत्नी जानकीस लिहिलेली ही पत्रे प्रथम प्रसिध्द झाली आणि वाचकांच्या पसंतीस उतरली. या पत्रांवर वाचकांच्या पत्रांचा पाऊस पडला. तत्वज्ञानावरचं लिखाण रूक्ष असतं पण हे लिखाण ललित साहित्यापेक्षा जास्त आनंददायी आहे त्यामुळे आमचे जीवन चांगले समृध्द होत असून मन:शांती प्राप्त होत आहे ही वाचकांची प्रतिक्रिया. आम्ही हे पुस्तक मोठ्या भक्तिभावाने प्रसिध्द करीत आहोत. असे प्रकाशकाचे शब्द आहेत. एकूण ३६ पत्रे आहेत. भाग १ - १८ पत्रे, भाग २ - १८ पत्रे.

१९०८ सालचा लेखकाचा जन्म. पहिले जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर. कायद्याच्या प्रांतात वेदापासून आतापर्यंत संशोधन करून एल्.एल्.एम. ही कायद्याची अत्युच्च पदवी मिळविण्याचा पहिला मान. १९५६ साली स्वप्नात योगेश्वर कृष्णाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कृष्णाची सेवा म्हणून व्याख्याने, प्रवचने व पुस्तके याबद्दल मानधन न घेता विद्यादानाचे व्रत न्यायदानाचे काम सांभाळून चालू आहे. सेल्स टॅक्सचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून १९७३ साली सेवानिवृत्त. तेव्हापासून रामजानकीचा परमार्थाचा दौरा. देवापासून वियोग न होण्याचा प्रयोग म्हणजे योग. जो देवापासून विभक्त होत नाही तो भक्त. या न्यायाने आपण खरेखुरे योगी व भक्त व्हावे एवढीच एकुलती एक महत्वाकांक्षा. कायद्याच्या प्रांतात दोन डझन पुस्तके व परमार्थाच्या प्रांतात सोळा पुस्तके नावावर आहेत.



योगेश्वर कृष्ण, अमृत ज्ञानेश्वरी भाग १ ते ७, गीतेच्या गाभाऱ्यात भाग १-२, जीवन गीता भाग १ ते १२, काशी रामेश्वर, गीता कृष्णेश्वर, व्दारकेचा राणा, गीता सप्ताह, काश्मीर कन्हैया, गीताधर्म अर्थात विश्वधर्म एवढी कृष्णावर व गीतेवर पुस्तके.

पती पत्नीची पत्रे वाचू नयेत म्हणतात, पण ही पत्रे गीतेची अंतरंग उलगडून दाखवणारी, सर्वांसाठी खुली अशी लिहिली आहेत. तुला तत्वज्ञानासारख्या रूक्ष विषयात रस निर्माण होऊन तू मला पत्रातून शंका विचारू लागलीस त्यामुळे मला अत्यंत आनंद झालाय. माझं भाग्यच उजळले. असं निवेदन करून तिच्या शंकांची उत्तरं म्हणजेच गीतेचं उलगडत गेलेलं अंतरंग.

पहिल्याच पत्रात 'तस्मात् युध्दस्व भारत' हा उपदेश अहिंसेच्या विरूध्द आहे किंवा गीता सांगणारा कृष्ण आपल्या जीवनात सत्याला फारशी किंमत देत नाही. किंवा गीता ही सत्य, अहिंसेच्या विरूध्द आहे असे काही आक्षेप विद्वानांनी घेतले आहेत. यात कितपत तथ्य आहे? असा प्रश्न पत्नीने पत्रातून पतीला केला आहे. व त्याचे

उत्तर पतीने पत्रातूनच दिलेले आहे. गीतेत दैवी संपत्तीचे वर्णन आहे. त्यामध्ये सत्य अहिंसेचा अंतर्भाव आहे. अशा परिस्थितीत गीता ही सत्य अहिंसेच्या विरूध्द आहे असे म्हणणे मनाला पटण्यासारखे नाही.

महाभारतात कृष्णाने म्हटले आहे, '**नोक्तपूर्वं मया मिथ्या स्वैरेष्वपि कदाचन**' थट्टेत देखील मी कधी खोटं बोललो नाही. विद्वानांना कृष्णाचे बोलणे गूढ वाटते. तुला देखील संशय निर्माण होईल. पण जरा सूक्ष्म विचार कर. लौकिक अर्थ व सूक्ष्म अर्थ ह्यामध्ये केव्हा केव्हा तफावत असते. सूक्ष्म विचार करणारे साधू संत म्हणतात - 'दया तिचे नाव। भूतांचे पालन। आणिक निर्दालन। कंटकांचे॥' दयेमध्ये दुष्टांचे निर्दालन ह्याचा अंतर्भाव असतो. हा सूक्ष्मविचार लौकिक दृष्टीला पटत नसला तरी सूक्ष्म विचाराला पटतो. दरोडेखोर हातात शस्त्र घेऊन विचारत असेल द्रव्य कोठे आहे? किंवा कसाई हातात शस्त्र घेऊन विचारत असेल गाय कोणत्या बाजूने गेली? तर अशा वेळी काय करावे? हा प्रश्न धार्मिकांना नेहमी भेडसावीत आला आहे.

**नास्ति सत्योत्परो धर्म:**। अशावेळी देखील खरे बोलावे असे भोळे लोक म्हणतात काहीही होऊ दे पण आपण कधी खोटे बोलू नये. पण धर्माचा सूक्ष्म बारकावा जाणणारे श्रीकृष्ण म्हणतात - 'श्रेयास्तमानृतं वक्तुं सत्यदिती विचारितम्।' अशावेळी सत्यापेक्षा असत्य बोलणे केव्हाही श्रेयस्कर असे विचारांती ठरले आहे. सत्याची व्याख्या करताना महाभारतात म्हटले आहे, **यद्भूतहितं अत्यंतं एतत्सत्य मतं मम**। ज्यामध्ये सर्व प्राणिमात्रांचे आत्यंतिक कल्याण आहे ते सत्य. एखादी गोष्ट लौकिक अर्थाने असत्य असेल पण सूक्ष्म धार्मिक दृष्टीने ती असत्य ठरणार नाही.

सूक्ष्म दृष्टीच्या दुर्बिणीतून तू पहा, म्हणजे तुला दिसेल की कृष्ण हा सत्याचा व अहिंसेचा पाठिराखा आहे. कृष्णाची सूक्ष्म दृष्टी पांडवांना सहाय्य करायला धावली नसती तर सत्याच्या स्थूल कल्पनेच्या खोड्यात त्यांची सुटका झाली नसती.

महाभारतातल्या दोन गोष्टी सांगतो म्हणजे याची सत्यता पटेल बघ. पहिली म्हणजे कौरव-पांडव युध्दात कर्णाने युधिष्ठिराचा पराभव केला, तेव्हा युधिष्ठिर रागावला व अर्जुनास म्हणाला, ''करायचे काय तुझे गांडीव. देऊन टाक ते दुसऱ्याला!'' जो कोणी माझ्या गांडीव धनुष्याला नावे ठेवील त्याला मी ठार करीन ही अर्जुनाची प्रतिज्ञा होती. त्यामुळे अर्जुन युधिष्ठीराला मारायला निघाला. कृष्ण म्हणाला, 'काय हा वेडेपणा!' (अर्जुन लौकिक (स्थूल) दृष्ट्या सत्याचे पालन करून सारा घोटाळा करणार होता.) 'तुला धर्माचा बारकावा कळत नाही. अशा तऱ्हेने सत्य प्रतिज्ञ होणे म्हणजे अधर्माचा कळस आहे. तू सत्याचा सूक्ष्म अर्थ लक्षात घे. जे सज्जन व मोठे आहेत त्यांची निर्भत्सना करणे म्हणजेच त्यांचा वध करण्याप्रमाणे आहे.' मग अर्जुनाने तसे केले व आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

नंतर अर्जुन म्हणाला युधिष्ठीराचा जो वध करील त्याला मारणे ही माझी दुसरी प्रतिज्ञा आहे आणि मी पर्यायाने युधिष्ठीराचा वध केलेला आहे. मी सत्य प्रतिज्ञ असल्यामुळे आता मी माझाच वध करतो. पुन्हा हाहा:काराचा प्रसंग. त्यावेळी कृष्ण म्हणाला, ''अरे धर्माचे रहस्य समजाऊन घे. जे सज्जन असतात त्यांनी स्वत:ची स्तुती करणे म्हणजे स्वत:चा वध केल्यासारखेच आहे.'' अर्जुनाने तसे केले व आपली दुसरी प्रतिज्ञा पूर्ण केली.

अलिकडच्या काळात गांधीजींनी खूप सत्याचे प्रयोग केले. त्यांनी प्रतिज्ञा केली मी मांस खाणार नाही, दूध पिणार नाही. एकदा ते आजारी पडले - डॉक्टर म्हणाले, दूध प्या. ते म्हणाले, मेलो तरी बेहत्तर पण दूध पिणार नाही. त्यावेळी कस्तुरबा म्हणाल्या, 'तुम्ही कोणते दूध पिणार नाही ठरवलेत?' ते म्हणाले, 'गाई म्हशींचे.'

'ठीक आहे मग तुम्ही शेळीचे दूध घ्या.' ते घ्यायले - बरे झाले. गांधीजींना गीताग्रंथ प्रिय - जीव की प्राण. कुठलीही समस्या गीताग्रंथाने सुटू शकते अशी त्यांची निष्ठा.

अहिंसेच्या बाबतीतही तसेच म्हणता येईल. मनूच्या पाच नितीतत्त्वामध्ये अहिंसेला स्थान दिले असले तरी सूक्ष्मविचार करता तो म्हणतो - **आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्** । आततायी म्हणजे अतिरेकी माणसाला बेलाशक मारावे, ही हत्या अहिंसेमध्ये समाविष्ट होते हा सूक्ष्म विचार तू लक्षात घे. पांडवांवर कमालीचा अन्याय झाला होता. युध्दाशिवाय दुसरा कोणताच मार्ग नव्हता म्हणून कृष्णाने अर्जुनाला युध्द करण्याचा उपदेश केला. कृष्णाचा उपदेश सत्य-अहिंसेच्याच बाजूचाच होता.

पत्र पाचवे - 'तू विचारलेस की काही लोक म्हणतात गीता ब्राह्मणांसाठी आहे. या म्हणण्यात कितपत तथ्य आहे?' यात काहीच तथ्य नाही. गीतेमध्ये फक्त चारच लोक बोलत आहेत, १) धृतराष्ट्र, २) संजय, ३) श्रीकृष्ण, ४) अर्जुन. या चारात एकही ब्राह्मण नाही.

पत्नीच्या शंका किंवा प्रश्न म्हणजे सामान्यांच्या मनात उठणाऱ्या शंका व प्रश्न घेऊन लेखकाने त्याचे यथायोग्य निरसन तेही सोप्या रसाळ शैलीत मार्मिक उदाहरणे देऊन केले आहे त्यामुळे गीतेतील तत्त्वज्ञानाची क्लिष्टता नाहीशी झाली आहे. हे लेखकाचे कसब आहे.

महाभारतात निरनिराळ्या भागांचे निरनिराळे मणी आहेत. त्या सर्वांचा मेरुमणी म्हणजे गीताखंड! हे गीताखंड ज्याला समजून घ्यायचे असेल त्याने हे लक्षात ठेवावे की कर्माच्या दुधाने, भक्तीच्या साखरेने आणि ज्ञानाच्या केशराने बनविलेले श्रीखंड म्हणजे गीताखंड!

'गीतेच्या गाभाऱ्यात' हे गीतेवर विवेचन आहे. तरी यात श्रीकृष्णाचा उल्लेख 'गोपाळकृष्ण' असा लेखकाने केलेला आहे. कृष्ण लहान असताना त्याला 'बाळकृष्ण', 'गोपाळकृष्ण' म्हटले जाई. पुढे तो भक्त व भगवंत यांच्या ऐक्याचे प्रतीक 'राधा-कृष्ण' झाला. गीता सांगणारा (श्री भगवानुवाच गीतेत म्हटले आहे.) भगवान श्रीकृष्ण किंवा योगेश्वर श्रीकृष्ण होता.

गीतेने ज्ञान-कर्म-भक्ती यांचा समन्वय केला आहे. कर्माची जूट, ज्ञानाची लूट आणि भक्तीची मूठ म्हणजेच गीतेची शिकवण अतूट!

पत्र ६ वे - जीवनात आनंद नाही, जीवनात स्वारस्य नाही, जीवनात मजा नाही. कारण साऱ्या प्रश्नांचे उत्तर एकच जीवनाला ध्येय नाही. (आपल्यातील ईश्वराला शरण जाऊन त्याप्रमाणे वागावे.) हे ध्येय मनुष्याने बाळगावे. जसं भाकरी करपली का? घोडा अडला का? पान सडले का? याचे उत्तर एकच फिरवलं नाही म्हणून.

देह प्रपंचाला वहायचा व चित्त हरीला वहायचे. म्हणजे प्रपंचाचा परमार्थ होतो. अपेक्षा वृक्षाला दुःखाची फार फळे येतात तर निरपेक्ष वृक्षाला सुखाची.

संस्कृतात गीता २७ आहेत. राम-गीता, यम-गीता, अनु-गीता, शीव-गीता, सूर्य गीता, हंस गीता, भगवद्गीता इ. ज्याप्रमाणे लोकमान्य म्हटल्यावर टिळक आठवतात, छत्रपती म्हटल्यावर शिवाजीराजे आठवतात, महात्मा म्हटल्यावर गांधीजी आठवतात याप्रमाणे गीता म्हटल्यावर भगवद्गीता लक्षात येते.

प्रथम दर्शन, मग श्रवण, नंतर मग ध्यान.

गुरु हा टेलिफोन ऑपरेटर प्रमाणे आहे. शिष्य आणि देव यांचे संबंध जोडून देणे हे त्याचे काम.

अर्जुन विपण्ण आहे. श्रीकृष्ण प्रसन्न आहे. अर्जुनाने रथाचे आणि मनाचे लगाम कृष्णाकडे सोपवले होते. सर्वांच्या हृदयात देव आहे. त्या अंतरंगातील दिव्य

शक्तीचे सारथ्य पत्करल्याशिवाय विषण्ण मनाला प्रसन्नता येत नाही.

'गीतेच्या गाभाऱ्यात' (भाग १ ला) यातील काही भाग वर उधृत केला आहे. त्यावरून गीतेच्या गाभाऱ्यात शिरायची आंतरिक ओढ तुम्हाला नक्कीच लागेल. तो लागला की हाती घ्या भाग २ रा. 'गीतेच्या गाभाऱ्याचा'.

स्तुती आणि निंदा समान वाटण्यासाठी (सुखदु:खे समेकृत्वा लाभा लाभौ जयाजयौ।) म्हणजे द्वंद्वातीत होण्यासाठी मी मौन पाळू लागलो. हा प्रयोग यशस्वी झाला. मौन पाळल्यावर आपण अंतर्मुख होतो आणि आत आत खोल खोल जाऊ लागतो. त्यामुळे क्रोध नाहीसा होतो. फुशारकी पण नाहीशी होते. (अंत:करणात देव आहे हे जाणून) 'तुल्य निंदा स्तुति: मौनी' असे गीतेमध्ये भक्तीची लक्षणे सांगताना म्हटले आहे.

या १९ व्या पत्रात गीतेच्या दुसऱ्या अध्यायांबद्दल शंका निरसन आले आहे. तर १ल्या पत्रात गीतेच्या समारोपात भगवंतांनी काय सांगितले आहे यावर विवेचन आहे. म्हणजे गीतेचे अध्याय पत्रात क्रमाक्रमाने घेतलेले नाहीत. कुठल्याही पत्रात कुठल्याही अध्यायाबद्दलची शंका व प्रश्न आणि त्यांचे निराकरण आलेले आहे.

युध्द संपल्यावर अर्जुनाने कृष्णाला पुन्हा गीता सांग म्हटले. तेव्हा कृष्ण म्हणाले, 'तेव्हा मी योगारूढ होतो आता तशीच पुन्हा सांगता येणार नाही'. तरी सांगितली ती 'अनुगीता'. पण गीता ती गीताच. अनुगीता कोणाला माहीतही नाही.

पत्र २० वे - तू विचारतेस काही लोक म्हणतात, गीता ऐकल्यानंतर देखील अर्जुन ज्ञानी झाला नाही. अज्ञानीच राहिला. महणूनच त्याने कर्म केले. ज्ञानप्राप्तीनंतर कर्म केले याचे कारण गीता ऐकून देखील तो ज्ञानी झाला नाही तो अज्ञानीच राहिला. तुम्हाला काय वाटते -

ज्ञानेश्वर शेवटच्या अध्यायात म्हणतात - ''हृदयाहृदय एक झाले। ये हृदयींचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडता केले। आपणा ऐसे अर्जुना॥'' गीता सांगून कृष्णाने अर्जुनाला आपण ऐसे का केले ज्ञानोत्तर कर्म वर्ज्य असे कोणी सांगितले? मी नाही का कर्म करतो? ज्ञानोत्तर कर्म लोकसंग्रहासाठी आदर्श म्हणून कर्म केलेच पाहिजे. गीतेत अकर्म म्हणजे कर्मशून्यता नसून उच्च उदात्त, उत्तुंग, शुध्द सात्त्विक कर्माला अकर्म म्हटले आहे. ज्ञानयोग काय, कर्मयोग काय किंवा भक्तियोग काय त्या साऱ्यांची मदार आपले कर्म अकर्म व्हावे यावर आहे.

३६ वे पत्र उपसंहाराचे आहे. यात प्रत्येक अध्यायाप्रमाणे सामान्य स्त्रीने काय करायला पाहिजे ते सांगा असे विचारले आहे. त्याचे उत्तर म्हणजे ३६ वे पत्र. उपसंहार -

जेव्हा मोह, आसक्ती निर्माण होईल तेव्हा मनाचे लगाम कृष्णाच्या (अंत:करणातल्या) हातात द्यावेत. त्याला शरण जावे.

२ रा अध्याय - फळाची आशा न धरता कर्तव्य कर्म कर. पुढे शेवटी स्थितप्रज्ञाचे वर्णन आहे. नंतर गुणातीत, नंतर ज्ञाननिष्ठ हे सर्व गीतेचे आदर्श आहेत.

३ रा अध्याय - फळाची आशा न धरता कर्तव्य कर्म कर व जे कर्म करशील ते देवाला अर्पण कर. म्हणजे हातून वाईट कर्म होणार नाही. याप्रमाणे सर्व अध्यायांप्रमाणे सामान्यांनी काय करायला पाहिजे हे सांगितले आहे.

काम्य कर्मांचा न्यास म्हणजे संन्यास. निष्कामकर्म, कृष्णार्पण कर्म हा गीतेचा पाया आहे. गीतेची सारी मदार अकर्मांवर आहे. अकर्म म्हणजे कर्म शून्यता नव्हे. गीतेच्या दृष्टीने शांती म्हणजेच मुक्ती. अकर्मामुळे शांती मिळेल. वेदांमध्ये शांतीचाच त्रिवार उच्चार केला जातो. ''ॐ शांति: शांति: शांति:''

१८ व्या अध्यायाच्या शेवटी लेखकाने म्हटले आहे की हे शेवटचे पत्र लिहीत असताना कृष्णाची मोहक मूर्ती स्वप्नात आली. डोक्यावर हात ठेवला व म्हणाले, गीतेच्या बाराव्या अध्यायात मी भक्ताची छत्तीस लक्षणे सांगितली आहेत. या छत्तीस पत्रांच्या पुण्यांनी तू माझी पूजा केलीस. तू खरा भक्त. आता प्रतिज्ञा करून सांगतो की जे कोणी नितान्त भक्तीभावाने या छत्तीस पत्रांचे एकट्याने वा सामुदायिकपणे पारायणे करतील त्यांना सुखशांती समाधान लाभेल.

तेव्हा या पुस्तकाच्या दोन्ही भागांचा म्हणजेच छत्तीस पत्रांचा व्यक्तिगत लाभ वाचकांनी जरूर करून घ्यावा. इतका खात्रीचा शांती सुख समाधानाचा मार्ग दाखवल्यानंतर मग आणखी काय पाहिजे? शिवाय गीतेचे तत्त्वज्ञान हसत खेळत विशेष कष्ट न पडता अगदी रोजच्या नेहमीच्या पत्राच्या सोप्या बोली भाषेत सहज समजून घेता येईल. म्हणजे गीतेचे तत्त्वज्ञानही समजेल व सुख शांती समाधानही लाभेल. नुसत्या या ३६ पत्रांच्या वाचनाने. तर किती सोयीचा मार्ग हा! कोणीही अवलंबू शकेल असा.

ज्ञानेश्वरांनी ५ व्या अध्यायातील ८ व्या श्लोकात म्हटले आहे -

जैसे निद्रेचे सुख न मोडे। आणि मार्गु तरी बहुसाल सांडे।
तैसे सोकासना सांगडे। सोहवे होय॥ ५-८

म्हणजे झोपण्याच्या सुखात व्यत्यय न येता रस्ताही पुष्कळ काटला जातो, अशा सुखकारक वाहनासारखा सोपा सोयीचा सिध्दांत सांगा.

तरी जाणां नेणां सकळां। हा कर्मयोगु कीर प्रांजळा।
जैसी नाव स्त्रिया बाळां। तोयतर्णी॥ ५ - १६

ज्ञानी व अज्ञानी या सर्वांनाच हा कर्मयोग खरोखर सोपा आहे. जशी नौका ही स्त्रिया व मुले यांनाही प्रवाहापलीकडे जाण्यासाठी सोयीची असते. (पोहण्याची कला येत नसली तरी पलीकडे जाता येते) तसेच भवसागर तरून जाण्यास कर्मयोग हे सुलभ साधन आहे. हुशार, बुध्दू, अज्ञानी, स्त्रिया, मुले सगळ्यांनाच कर्मयोग हा सोपा सोयीचा मार्ग आहे. नौकेप्रमाणेच जसं पोहणे येत नसताना सुद्धा नौकेद्वारा ते प्रवाहापलीकडे जातील तसेच तत्त्वज्ञान समजण्याची पात्रता नसलेल्यांनाही या ३६ पत्रांच्या पारायणांनी सुख शांती समाधान लाभू शकेल.

अर्जुनाला म्हणजे सर्वसाधारण माणसाला सोपा मार्ग, उपाय हवा आहे तो उपाय कर्ममार्ग, कर्मयोग आहे. श्रीकृष्ण म्हणतो आहे, कर्मयोगु कीर प्रांजळा! त्याहीपेक्षा सोपा मार्ग अगदी सर्वांना सहज आचरता येईल असा लेखकाच्या स्वप्नात येऊन श्रीकृष्णाने सांगितला आहे. वाचकांनी त्याचा लाभ जरूर घ्यावा.

**गीतेच्या गाभाऱ्यात**
आवृत्ती ४ थी १९९७
लेखक - न्या. राम केशव रानडे (एल्.एल्.एम.)
प्रसाद प्रकाशन पुणे - ३०
किंमत - भाग १ - १०० रू. पृष्ठे २१६
भाग २ - १२५ रू. पृष्ठे ३०७

**- आशा भिडे**
१३/९, विजय अपार्टमेंट,
'आराधना' टॉकीजजवळ, ठाणे ४०० ६०२.
• दूरध्वनी: २५४१ ०१४०

प्रतिक्रियांसाठी
दूरध्वनी
२५४२ ६२७०
२५३३ ७६७२

# ग्रंथोपासनेसाठी ज्ञानपंचमी

*ज्ञानपंचमी ही संकल्पना भारतीय संस्कृतीतील एक आदर भावना आहे. सरस्वती देवीचे महात्म्य सांगणाऱ्या या दिवसाबद्दल - संपादक*

दरवर्षी कार्तिक शुद्ध पंचमी हा दिवस 'ज्ञानपंचमी' म्हणून पाळला जातो. भारतीय वैदिक संस्कृतीने तसेच जैन परंपरेनेही ज्ञानालाच ब्रह्म व सरस्वतीला ज्ञानाची अधिष्ठात्री देवता मानलेले आहे. म्हणून दरवर्षी ज्ञानपंचमीला तिचे स्मरण, पूजन केले जाते.

आपल्या आर्य पूर्वजांची समृद्ध संस्कृती सरस्वती नदीच्या तीरावर बहरली. त्यांचे मंत्र ज्ञान हे मौखिक असल्याने मंत्राधारित विचार करणाऱ्या आर्यांना, ऋषीमुनींना वाणी, वागीश्वरी रूपात कल्पिलेल्या सरस्वतीचे फार महत्त्व होते. तिच्या सामर्थ्याने, स्फूर्तीनेच त्यांची ज्ञानेंद्रिये क्रियाशील राहात. तिच्यावरील श्रद्धेमुळेच ते विचार, उच्चार आणि आचार शक्तींचा विचार करू शकले. ती अमूर्त विचारशक्तीचे मूर्तस्वरूप व वेदांच्या निर्मितीची केंद्रबिंदू आहे. तिच्यामुळेच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, पृथ्वी, आकाश व वातावरण यांचा वेध घेता येतो. तिच्यामुळेच या पृथ्वीतलावरील वृक्ष व प्राणीजीवनाचे ज्ञान होते. शद्बब्रह्माची ही निर्मिती जगातील मानवांच्या साऱ्या कल्पना व विचार विश्वाची जननी आहे. भारतीय मनाने निसर्गशक्ती, लोकशक्ती व त्याबद्दलच्या कल्पना यांच्या सहाय्याने ज्ञानरूपी ब्रह्माच्या चिंतनासाठी या ज्ञानदात्री देवतेच्या प्रतिमेची निर्मिती करून आपल्या जीवनदर्शी विचारांना आधार दिला.

ज्ञानाची सृजन देवता ही संकल्पना उभी राहिल्याखेरीज सारे ज्ञान अपुरे आहे. म्हणून भारतीय मनाने सृजनशील स्त्रीतत्त्वाला सरस्वती, लक्ष्मी व दुर्गा अशा त्रिविध देवतारूपात कल्पिले. नवरात्रात होणाऱ्या पूजापर्वातही प्रथम सरस्वतीपूजन, मग दुर्गा व त्यानंतर लक्ष्मीपूजन असा क्रम मानला गेला आहे. यापैकी सरस्वती देवी ऋग्वेद ते पुराणकाळ या कालप्रवासात तीन वेगवेगळ्या भूमिकांत लोकमानसात वसलेली दिसते. यापैकी पहिली भूमिका वाक् किंवा वाणी, दुसरी नदी वा इरावती आणि तिसरी ज्ञानदात्री देवता. पहिल्या भूमिकेत ब्रम्ही, भारती, भाषा, गीत, वाक्, वाणी, शारदा आणि वर्णमाला ही तिची रूपे आहेत. माणसांच्या भावना, कल्पना व विचार प्रकट करण्याच्या साधनांचे ते प्रत्यक्षीकरण किंवा मूर्तरूप आहे. उपनिषदांतही सरस्वतीची वाणीशी एकरूपता मानलेली आहे आणि प्रज्ञावृद्धीसाठी व वाणीत गोडवा येण्यासाठी तिची प्रार्थना केलेली आहे. तसेच अस्खलित, ओघवती वाणी म्हणजे सरस्वती (नदी) चा ओघवता प्रवाह अशी तुलना केलेली आहे.

तिसरे रूप संपूर्ण सरस्वती देवीचे. त्यात ज्ञान, भाषा आणि (नदीरूपाने) पोषण या कल्पना सम्मिलीत झालेल्या आहेत. देवता रूपात ती वाणीची स्फूर्तिदेवता, ज्ञान, विद्या, कला, विज्ञान व साहित्य यांची अधिष्ठात्री देवता मानली जाते. यात तिची वाक्, वाग्देवी, वागीश्वरी, शारदा, वीणा व पाणी ही रूपे मानली जातात. सरस्वती शद्बाचा अर्थ गतिमयी. आध्यात्मिक अर्थाने ती निष्क्रीय ब्रह्म्याचे सक्रिय रूप आहे. म्हणून तिला ब्रह्मा (सत्व), विष्णु (रज), महेश (तम) यांना गती देणारी शक्ती म्हणतात. ज्योतिर्मय ब्रह्म्याचे प्रतीक म्हणून तिला ज्योतिर्मयी असेही म्हणतात. मूर्ति-प्रतीकरूपाने पाहिल्यास सरस्वतीच्या चार भुजा या चार दिशा म्हणजेच ज्ञानाच्या सर्वव्यापित्वाचे प्रतीक आहे. तिच्या हातातील पुस्तक हे ज्ञानप्राप्तीचे साधन तर जपमाळ हे एकाग्रतेचे, चिंतनाचे प्रतिक आहे. वीणा हे जीवनसंगीताचे व मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या संगीतकलेचे प्रतीक आहे. कमंडलु हे

ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या पावित्र्याचे, वैराग्याचे व प्रवाहीपणाचे प्रतिक आहे. तिचे पांढरे वस्त्र व हंससानिध्य तिचे मूळ रूप सूचित करते.

भारतीय संस्कृतीत विकसित झालेल्या हिंदु, जैन व बौद्ध अशा तिनही धार्मिक परंपरांत ज्ञानप्राप्तीला परम ध्येय मानल्यामुळे त्याच्या साधनेसाठी सरस्वतीला पूज्य मानले आहे. जैन दर्शनातल्या सोळा विद्यादेवींची ही देवी आहे. तीर्थंकरांच्या पवित्र मुखातून स्रवलेल्या वाग्धारांमधून प्रकट झालेल्या श्रुतज्ञानाची दात्री म्हणून हिला श्रुतदेवी म्हटलेले आहे. त्याचबरोबर ब्राह्मी (हे एका लिपीचेही नाव आहे.) वाक्, वाणी, वचस्, वचन, व्याहार, भाषा, भाषित, गौ, गी, श्रुतदेवता अशा विविध नावांनी तिला आळवलेले आहे. बौद्ध परंपरेत तिला मंजुश्रीची पत्नी मानले आहे आणि महासरस्वती, वज्रसरस्वती, वज्रशारदा, आर्यसरस्वती व वज्रवीणा सरस्वती अशी तिची पाच रूपे कल्पिलेली आहे. या तिन्ही परंपरांत सरस्वती हे बहुश्रुततेचे, विद्यासंपन्नतेचे, बुद्धिचातुर्याचे प्रतीक असून ते बहुमानाचे स्थान, पद आहे. बुद्धिमतेच्या विविध पैलूंचा विकास होण्यासाठी विद्येचे स्मरण राहावे, प्रतिभा स्फुरावी अशी एका सरस्वतीस्तोत्रात प्रार्थना केलेली आहे. आज प्रत्येक विद्यार्थ्याने आणि खऱ्या शिक्षकानेही ही प्रार्थना समजावून घेणे उचित वाटते :

ज्ञानं देहि, स्मृतीं देहि विद्या विद्याधिदेवते
प्रतिष्ठां कवितां देहि शक्तिं शिष्य प्रबोधिकाम्॥
ज्ञानं देहि स्मृतीं विद्यां, शक्तिं शिष्य प्रबोधिनीम्
ग्रंथकर्तृत्व शक्तिं च सुशिष्यं सुप्रतिष्ठितम्॥
प्रतिभां सत्सभायां च विचार क्षमतां शुभाम्
ब्रम्हस्वरूपा परमा ज्योतिरूपा सनातनी
सर्वविद्याधिदेवी या तस्यै वाण्यै नामोनमः॥
विसर्गबिंदुमात्रासु, यदधिष्ठानम् एव च
तदधिष्ठात्री या देवी तस्यै नित्यै नमोनमः॥
व्याख्या स्वरूपा या देवी व्याख्याधिष्ठातृरूपिणी
यया विना प्रसंख्यावान् संख्या कर्तुं न शक्यते
कालसंख्यारूपा या तस्यै देव्यै नमोनमः॥
भ्रमसिद्धान्तरूपा या तस्यै देव्यै नमोनमः
स्मृतिशक्ती, ज्ञानशक्ति, बुद्धिशक्ती स्वरूपिणी
प्रतिभाकल्पना शक्तिर्या च तस्यै नित्यै नमोनमः॥

(भावार्थ :- हे विद्याधीदेवते सरस्वती आम्हाला ज्ञान दे, स्मृती दे, (त्यायोगे) आम्हाला प्रतिष्ठा मिळवून दे. आमच्या वाणीत, विचारात काव्यात्मकता दे, आमच्या विद्यार्थ्यांचे, शिष्यांचे प्रबोधन करून त्यांना सुप्रतिष्ठित करण्याचे बळ दे, आमच्या हातून चांगले ग्रंथ निर्माण होतील अशी शक्ती दे, प्रतिभा दे, सज्जनांच्या विद्वानांच्या सभांमधून (चर्चासत्रांमधून) चांगले विचार मांडण्याची क्षमता दे. विसर्ग, अनुस्वार, काना, मात्रा, उकार यांनी युक्त असलेल्या शब्दांचे सुलेखन हे तुझेच रूप आहे. तुझ्यामुळेच विविध संकल्पना, व्याख्या करता येतात, तुझ्याशिवाय अंक, संख्या यांची निर्मिती करता येणार नाही. स्मृतिशक्ती, ज्ञानशक्ती, बुद्धीशक्ती, कल्पनाशक्ती, प्रतिभा, विविध सिद्धांत या रूपात वास करणाऱ्या ज्योतिर्मयी वाणीदेवते तुला नमस्कार असो!)

ज्ञानपंचमीला लाभपंचमी असेही म्हणतात. भारतीय संस्कृतीत ज्ञानप्राप्ती म्हणजेच मोक्षप्राप्ती असे मानलेले आहे. अशा मोक्षाची प्राप्ती हा जीवनातला खराखुरा लाभ आहे. म्हणून या दिवशी ग्रंथाची पूजा करतात. अशाप्रकारे नियमित धार्मिक ग्रंथांची, पोथ्यांची साफसफाई व पूजा झाल्याने बरेच ग्रंथ सुरक्षित राहिलेले आहेत. हा सुद्धा या रूढीपासून झालेला मोठाच लाभ आहे. म्हणून आजच्या काळात सुद्धा विविध ग्रंथालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांनी ज्ञानपंचमीचे औचित्य साधून आपल्या ग्रंथसंग्रहाचे जतन, संरक्षण करणे, त्याची लोकांना ओळख व्हावी म्हणून प्रदर्शने भरविणे व ज्ञानोपासनेचे महत्त्व लोकांच्या नजरेला आणून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

डॉ. नरेंद्र बोरवारे
मुक्त विद्यापीठ, नाशिक

**पुस्तक परिचय**

# जगावेगळ्या

जगावेगळे काही करून दाखवून मानवी जीवनाचा चिरकालीन फायदा करून देणारी, इतिहासावर कायमचा ठसा उमटवणारी माणसे सर्वसामान्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देतात. अशा जगावेगळ्या कर्तृत्ववानांच्या अस्तित्वामुळेच जगाचा इतिहास घडतो, समृद्ध होतो. देशोदेशीच्या अशा असामान्य स्त्रियांची व त्यांच्या असाधारण कर्तृत्वाची माहिती प्राचार्य अशोक चिटणीस यांच्या 'जगावेगळ्या' या ग्रंथाचा विषय आहे.

यासाठी अशा २५ स्त्रियांची त्यांनी निवड केली आहे. यातील काही लेख लोकसत्तेच्या चतुरंग पुरवणीतून यापूर्वी प्रकाशित झाले होते. यातील मनोगतात स्त्रियांना गौरविले जाण्याचा मानभावीपणावर लेखकाने वास्तव असे भाष्य केले आहे. अनेक माध्यमांतून 'जगावेगळ्या' असंख्य स्त्रिया आपल्याला भेटत राहिल्या अशीही नोंद मनोगतात आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत, पराकाष्ठेची जिद्द बाळगीत या स्त्रियांनी आपल्या ध्येयापर्यंत वाटचाल केली आहे. यातील एकेका स्त्रीचे वर्णन, तिचे कर्तृत्व मनाला उमेद देणारे, वृत्ती सकारात्मक करणारे असे आहे. तिची कथा शब्दबद्ध करताना प्रवाही आणि प्रभावी भाषा सतत साथ करीत रहाते.

या लेखांमध्ये जगातल्या सर्व प्रमुख देशातल्या महिलांचा समावेश आहे.यातील अनेक तर अल्पजीवी ठरल्या. तरीही काळावर आपला ठसा उमटवून गेल्या. यातील सर्वच लेख मुळातून वाचावेत असे आहेत. एव्हिटा पेरॉन यांनी आपल्या असोसिएशन ऑफ वूमन सफरेज (AWS) या संस्थेच्या माध्यमातून अर्जेंटिनात जे काम केले ते इतके महत्त्वाचे होते की आजही अर्जेंटिनातील स्त्रिया त्यांच्याबद्दल कृतज्ञ असतात. स्त्रीची वेदना काय असते याबद्दल एव्हिटा पेरॉन यांचे एक अवतरण पृ. १५ वर आहे. या जगावेगळ्या स्त्रीचे मरण व दफनही जगावेगळेच होते. या पुस्तकातील अनेक स्त्रियांची नावे आपल्याला नवीनही असू शकतात. उदा. जेन गुडाल (पृ.७८), मदर जोन्स (पृ.९९), मार्गारेट सँगर (पृ.६८) इ. पण यांनी गाजवलेली कर्तृत्व मात्र अफाट आहेत.

या पुस्तकातील या जगावेगळ्या स्त्रियांबद्दल लिहिताना अनेक ठिकाणी प्राचार्य चिटणीस आपल्या मराठी जीवनातील संदर्भ देतात. उदा. एव्हिटा पेरॉनचा जो छळ झाला, जे दारिद्र्य तिने भोगले व त्यातून ती वर कशी आली हे सर्व लिहिताना चिटणीसांना ज्ञानेश्वर महाराज व पसायदानाची आठवण येते. मार्गारेट सँगरने कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल लिहिताना र. धों. कर्वे यांची चिटणीसांना आठवण येते. डुवोर्सबद्दल लिहिताना त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आठवतात. हे या पुस्तकाचे वेगळेपण म्हणावे लागेल. केवळ चरित्र लिहिण्यासाठी एकपणाचा रुक्षपणा चरित्रकाराच्या शैलीत नकळत येतो. मात्र चिटणीसांचे वैशिष्ट्य आहे की यातील प्रत्येक जगावेगळे चरित्र उलगडून दाखवताना त्यांच्या शैलीत एक सहज अनौपचारिकता येते. त्यामुळे व मराठी संदर्भांमुळे पुस्तक वाचनीय होते. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर श्री. ना. पेंडसे यांचा जो अभिप्राय दिलेला आहे त्यात म्हटल्याप्रमाणे विशेषतः विद्यार्थ्यांनी हा ग्रंथ वाचावा. पण त्यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की नकारात्मक विचार करणाऱ्या कोणीही या पुस्तकाचे एकदा वाचन करावेच. त्याचा दृष्टिकोन यामुळे बदलून जाईल.

जेन गुडाल या चिंपांझीच्या संशोधिकेने आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाविषयी जे लिहिले आहे ते या पुस्तकातील सर्व जीवन कथांचे सूत्र आहे. 'आपल्या

आयुष्याची आपल्याला मिळालेली देणगी आपण कशी वापरायची हे आपण ठरवायचे असते. आजूबाजूचे विश्व सुंदर करण्यासाठी आपण आपले आयुष्य खर्च करणार की बेफिकिरपणे जाणार हे आपणच ठरवतो.' (पृ.८२)

परचुरे प्रकाशन मंदिर हे या पुस्तकाचे प्रकाशक आहेत. त्यांची ग्रंथ निर्मिती ही उत्तम असते. मात्र यातील कृष्णधवल छायाचित्रे रंगीत स्वरूपात पहाणे अधिक भावले असते असे वाटते. विद्यार्थ्यांनी वाचावं असे खूप साहित्य असतं आणि विद्यार्थी वाचत नाहीत याबद्दल नक्राश्रूही ढाळले जात असताना या पुस्तकाच्या वाचनानंतर मला जाणवलेल्या काही बाबी मुद्दाम क्रमशः देत आहे.

१) अशा प्रकारची प्रेरणादायी ठरतील अशी पुस्तके ही भाषेतील महत्त्वाचे योगदान असतात.

२) त्यांची उपेक्षा होऊ नये म्हणून शाळांनी स्वतः विद्यार्थ्यांना रॅपिड रिडींग (अवांतर वाचन) साठी असे पुस्तक अनिवार्य करायला हवे.त्यावर स्वतंत्र प्रश्न असावेत.

३) हे व्हावयाचे असेल तर प्रकाशकांच्या संघटनांनी शासनाच्या शिक्षण खात्यामध्ये लागावे, पाठपुरावा करावा.

परचुरेंसारखे प्रकाशक यादृष्टीने काही करतील अशी आशा आहे. प्राचार्य चिटणीसांसारख्या शिक्षकांनी अतिशय मेहनतीने हे पुस्तक लिहिले आहे. मराठी साहित्यात ही मोलाची भर आहे. त्या दृष्टीने प्रत्येक वाचणाऱ्याने दुसऱ्याला या पुस्तकाचा आग्रह धरायला हवा.

जगावेगळ्या - चिटणीस, अशोक

मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, २००५.

पृष्ठ २३, १३३ मूल्य १५०/- फक्त.

- प्रा. मोहन पाठक

## चुकीची दुरुस्ती

१. जुलै २००५ पृ. ३३

'पहिलं पुस्तक' या रमेश राऊत संपादित पुस्तकाचा परिचय सौ दीपाली हिंदळेकर यांनी केलं आहे. - संपा. रमेश राऊत या जागी त्यांचे नाव हवे होते.

२. ऑग. २००५ पृ. ३९

परिसर वार्तातील पहिलीच निकालाची वार्ता सौ. ए.के. जोशी विद्यालयाच्या निकालाची आहे. अनवधानाने डॉ. बेडेकर विद्या मंदिर छापले गेले आहे.

३. ऑगस्ट २००५ मलपृष्ठ क्र.३-

विद्यार्थ्यांच्या नावाबाबत पुनरूक्ती झाली आहे. सुधारित यादी या अंकात देत आहोत.

या चुकांबद्दल दिलगीर आहोत!

- संपादक

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

**ग्रंथ जगत**

# चतुरस्त्र लेखक प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी

चतुरस्त्र लेखक प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी (श्रीमायबोली, बंगला नं. १८, गजानन सोसायटी, दौंड-४१३८०१. जि. पुणे. दूरध्वनी: ९५२११७-२६५३९१) यांच्या काही वाचनीय / संग्राह्य पुस्तकांची माहिती पुढीलप्रमाणे.

### १) 'आस्वादक ज्ञानेश्वरी'

(पृ. ३५६, मूल्य रु. २२५/-, प्र.आ. २५-९-१९९९). डॉ. मोकाशी आज अनेक वर्षे संत साहित्य व ज्ञानेश्वरीचा नित्यनियमाने अभ्यास आणि पारायणे करीत आलेले आहेत. विविध विषयावरील त्यांचे लेखन वाचन सतत चालू असते. त्यांतूनच केवळ आस्वादकाच्या भूमिकेतून त्यांनी या ग्रंथाचे लेखन केले. आपल्या 'मनोगतीत' (निमित्त) ते म्हणतात, '... साहजिकच मतमतांतरे, सैध्दांतिक चर्चा, क्लिष्ट संकल्पना, वादविवाद यांना वाव न देता केवळ भक्तिभावनेतूनच सर्वसामान्य पातळीवरच या ग्रंथातील विविध विषयांचा आस्वाद घेता आला. या पलीकडे न जाता **'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ॥ एक तरी ओवी अनुभवावी॥** '' याच दृष्टिकोनातून हे लेखन, संकलन आणि संपादन केलेले आहे. सर्वसामान्य भाविक व धार्मिक वृत्तीचे वाचक, रसिक, जाणकार तसेच विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनाही या संदर्भात हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असे वाटते.''

'श्री ज्ञानेश्वरीतील गणेश वंदन''श्री ज्ञानेश्वरीतील नमने' (मंगलाचरण) इ.३२ लेखांचे संकलन या ग्रंथात आहे. त्यातील कांही लेखांना विविध नियतकालिकांतून पूर्वप्रसिद्धी मिळालेली आहे. डॉ. म.श्री. कानडे (भूतपूर्व मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ) यांची छोटेशीच पण विवेचक मार्गदर्शक प्रस्तावना या ग्रंथास लाभली आहे.

### २) 'शैलीदार लेखसंग्रह'

हा मौलिक ग्रंथ (पृ. ४१६, मूल्य रु. ३००/-, दोन्ही ग्रंथांचे प्रकाशक स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, ८६३, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ९५२०-२४४७२५४९) प्रस्तुत ग्रंथाची प्रथम आवृत्ती १ मे २००३ रोजी प्रकाशित झालेली आहे. यामध्ये विविध विषयांवरील एकूण ७६ लेखांचे संकलन आहे. (ह्यातील कित्येक लेख पूर्वी अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.) 'विज्ञान, संगणक, माहिती तंत्रज्ञान' यावर ७ लेख, वाङ्मयावरील ६ लेख, 'धर्म-अध्यात्म' वरील ६ लेख, 'व्यक्ती-चरित्र-कार्य' वरील १९ लेख 'सामाजिक - स्थिती-गती' वर १२ लेख, 'राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय' वर १४ लेख, 'शिक्षण' विषयावर १० लेख व महिलाविषयक २ लेख असे ते एकूण ७६ लेख आहेत. डॉ. मोकाशींचे हे सारे लेखन स्तिमित करणारे आहे. या सर्वांचे वाङ्मयीन - निबंध पातळीवरील मूल्य फार मोठे आहे. शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व इतर जाणकार वाचकांनाही ही लेखसंग्रह विशेष उपयुक्त आहे. वर्तमान मानसिकतेचे प्रतिनिधिक प्रतिबिंब या संग्रहात आहे. वैचारिकतेपेक्षा संवेदनाशील मनाची प्रतिक्रिया हे लेखनाचे सूत्र आहे. अनुभवाचा सच्चेपणा, शिक्षणाची तळमळ, सामाजिक आस्था आणि जडण घडणाची संकल्पना अशी चौपदरी आस हा या लेखनाचा गाभा आहे. असे प्रस्तावनाकार अनंत दीक्षित (संपादक सकाळ) यांनी म्हटले आहे ते अत्यंत रास्त आहे.

### ३) दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ

डॉ. मधुकर मोकाशी हे अगदी सुरुवातीच्या काळापासून दलित रंगभूमी आणि दलित नाट्य चळवळीचे

उत्साही साक्षीदार आहेत. त्यांनी अनेक नाट्यविषयक कार्यकाळा, अभिनय शिबिरे, मेळावे आणि दलित एकांकिका महोत्सवात अभ्यासक समीक्षक व मार्गदर्शक म्हणून उत्स्फूर्तपणे सहभाग घेतलेला आहे.

डॉ. मोकाशींच्या पीएच.डी. पदवी विषयावरील हा ग्रंथ आहे. तरीही तो संपूर्णपणे वेगळ्या पद्धतीने व नव्या प्रकरणांच्या अद्ययावत माहितींनी संकलित केलेला आहे. या ग्रंथाची पृष्ठे आहेत २३८ व मूल्य आहे रु. १६०/- यातील ६ प्रकरणांची नावे अशी - १) 'दलित रंगभूमी आणि नाट्यचळवळ - पूर्व परंपरा.' २) 'दलित रंगभूमी आणि नाट्य स्वरुप व वैशिष्ट्ये' ३) अखिल भारतीय दलित नाट्य परिषद अहवाल नाट्यसंमेलने व अध्यक्षीय भाषणे; प्रकरण ४ हे शोधनिबंधाचे आहे. 'दलित रंगभूमी आणि प्रबुद्ध रंगभूमी', 'दलित रंगभूमी आणि सद्यःस्थिती' इ. आठ शोधनिबंध त्यात आहेत. ५) 'दलित रंगभूमीच्या संदर्भात नाट्यकृतींचा अभ्यास आणि ६) 'दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ' एकांकिका व पथनाट्य. पुणे विद्यापीठात याच विषयावर त्यांनी एम्. फिल आणि पीएच्.डी. केली असल्याने दलित रंगभूमी, पुणे सह सर्व नाट्य संस्था, दिग्दर्शक, नाट्यलेखक-कलाकार, हितचिंतक, समीक्षक आणि अ.भा. दलित नाट्य परिषद या सर्वांनी त्यांना बहुमोल मदत केली आणि त्यामुळेच हा ग्रंथ साकार झालेला असे त्यांनी आपल्या 'मनोगतात' (काय म्या पामरे लिहावे?) कृतज्ञतेनं नमूद केले आहे. या ग्रंथाच्या ५ परिशिष्टांतून (अ-'संदर्भसूची', ब-'नाट्यकृतींचा अभ्यास', क-'अध्यक्षीय भाषणे', ड-नियतकालिके/ मासिके / दैनिके आणि इ-'समग्र दलित नाट्यसूची' त्यांनी अत्यंत महत्त्वाची माहिती संकलित केलेली आहे.

या ग्रंथाचे प्रकाशक आहेत स्नेहल पब्लिशिंग हाऊस (डॉ. स्नेहल तावरे), पुणे - ३० आणि याची प्रथम आवृत्ती २६-१-२००० रोजी प्रकाशित झालेली आहे. रंगभूमीशी संबंधित असणाऱ्या प्रत्येकाने हा ग्रंथ संग्रही ठेवावा अशी शिफारस करावीशी वाटते.

### ४) 'पोलिस-समाज आणि शासन'

प्रस्तुत पुस्तकास (पृ.१६४, मूल्य रु.१२०/-) निवृत्त पोलीस महासंचालक भास्करराव निसर यांची सुंदर प्रस्तावना लाभलेली आहे. ते म्हणतात, "डॉ. मधुकर मोकाशी यांनी काळाची गरज ओळखलेली आहे. त्यांना पोलीस अधिकाऱ्यांचे कार्य, त्यांचे गुणदोष यांची नेमकी जाणीव आहे. पोलिस अधिकारी जे चांगले सामाजिक कार्य करीत आहेत, त्याची त्यांनी मनापासून वाखाणणी केलेली आहे. ते ज्या पोलिस प्रशिक्षणार्थींना शिकवतात, त्यांच्या समोर त्यांनी आदर्श उभे केले आहेत. पोलिसांच्या जीवनातील अडचणी त्यांनी सविस्तरपणे मांडल्या आहेत. नवीन पिढीतील पोलिसांचे मनोधैर्य टिकविण्यासाठी ही माहिती उपयुक्त आहे. मात्र जे दोष आहेत ते पोलिसांनी स्वतःच दूर करावयाचे आहेत हेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. सामाजिक गरज भागविणारे साहित्य म्हणून या पुस्तकाचे महत्त्व आहे."

पोलीसांच्या बरोबरीनेच समाज प्रत्येक नागरिकाचेही समाजात शांतता-सुव्यवस्था -कायदा प्रस्थापित होण्याच्या कामी सहकार्याची जरुरी असते. तेव्हा पोलिसांना तपास कामात मदत करणे आपले कर्तव्य ठरते. याशिवाय पोलीस आपले कर्तव्य हे चोख आणि प्रामाणिकपणे बजावत असताना त्यांच्या कामकाजाविषयी कधीकधी हेतूतः तक्रारी, गैरसमज निर्माण केले जातात त्यात तथ्य असतेच असे नाही! हे सांगून ॲड. नंदा भोसले (दौंड) पुस्तकाला दिलेल्या आपल्या पुरस्कारात ('पोलीसाची जीवन गाथा') पुढे म्हणतात, "डॉ. मधुकर मोकाशी यांनी 'पोलिस : समाज आणि शासन' हे पुस्तक लिहून पोलिसांसह समाज आणि शासनाला देखील मार्गदर्शनपर भूमिका स्वीकारून उत्तम पद्धत, पोलीसांची भूमिका आणि संपूर्ण पोलिसदल याविषयीची पूर्वीपासूनची माहिती, पोलिसांचे आयोग, त्यांतील सुधारणा-उद्दिष्टे,

कार्यक्षेत्र या सर्व मुद्द्यांचा तपशीलवार परामर्श घेऊन 'पोलीसांमध्येही एक माणूस असतो. तो देखील आपल्यासारखा एक नागरिक आहे' या विषयी सोप्या भाषेत आपल्याला समजावून दिले आहे.''

आपल्या 'मनोगतां'त लेखक (वर्दीविषयी लिहितांना) म्हणतात, 'या विषयासाठी सातत्याने वाचन, नव्या नोंदींचे टिपण, वृत्तपत्रीय संदर्भ यांचा आधार घेतला आहे. त्याचप्रमाणे व्याख्यान - प्रशिक्षण केंद्रामध्ये उपस्थित असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांचे अनुभव, विचार यांचा विशेषत्वाने उपयोग केलेला आहे.''

डॉ. मोकाशी यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे आपल्या प्रत्येक पुस्तकांत परिशिष्टे व संदर्भ सूची यातून ते अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती आपल्यासमोर ठेवतात. तशी ती या पुस्तकांत ही आहेच. २६.१.२००४ रोजी या पुस्तकाची प्रथम आवृत्ती स्नेहवर्धन प्रकाशन (पुणे) यांनी प्रसिद्ध केलेली आहे. मराठी साहित्यात एका उत्कृष्ट पुस्तकाची भर घातल्याबद्दल त्यांचे व लेखक डॉ. मधुकर मोकाशी यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

**५) मराठी भाषेची स्थिती आणि गती**

डॉ. मोकाशी यांचे आणखी एक उत्कृष्ट पुस्तक (पृ. १६४, मूल्य रु. १३०/-, प्र. आवृत्ती २५.१.२००१, प्रकाशक - दादासाहेब लोणकर, ''साहित्य कलायात्री'' प्रकाशन, 'कलायत्री भवन', केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११०३६. दूरध्वनीः ९५२०-२६८१६०८४.) म्हणजे मराठी भाषेची स्थिती आणि गती (संदर्भ ग्रंथ) हे होय.

मायबोलीच्या प्रेमाखातर प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती त्यांनी केलेली आहे. ग्रामीण परिसरात संदर्भ ग्रंथ व अद्ययावत माहितीचा खजिना सहजासहजी उपलब्ध होत नाही. त्यासाठी बरीच यातायात करावी लागते. अजूनही याबाबतीत ''मराठी भाषा व महाराष्ट्र संदर्भ नोंदी'' आणि महाराष्ट्र गीते (गुणगौरव) बरीचशी उपलब्ध झालेली नाहीत. त्याविषयी शोध घेणे जरुर आहे असे ते म्हणतात.

मराठी भाषेच्या संदर्भातच मर्यादितपणे लेखन करुन प्रस्तुत ग्रंथात विविध प्रकरणे (क्र. १ 'महाराष्ट्र आणि मराठी भाषा नामनिर्देश व गौरव गीते' २. 'मातृभाषा मराठी - आमचा मान! आमचा अभिमान' ३. 'मराठी भाषेची सद्यस्थिती' यामध्ये विचारप्रवर्तक असे सहा लेख आहेत. ४. शोधनिबंध यामध्येही साक्षेपी विचार मांडणारे सहा लेख आहेत.) समाविष्ट करताना या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि मान्यवर व्यक्ती यांचेही विचार त्यांनी संकलित केलेले आहेत. भविष्यकाळात मराठीच्या विकासासाठी आपणा सर्वांना नेमके काय करता येईल याचाही शोध घेता येईल व योग्य ती पावले उचलता येतील अशी त्यांची अपेक्षा आहे. शोध निबंधांमध्ये त्यांनी सद्यःस्थितीवर थोडक्यात प्रकाश टाकला असून जिज्ञासू, रसिक वाचक व मराठी प्रेमींना त्यातील विचार उद्बोधक व विचार प्रेरक वाटतील यात शंका नाही.

पुण्याचे श्रेष्ठ समीक्षक डॉ. कल्याण काळे यांची विवेचक, मर्मग्राही, सर्वस्पर्शी प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. डॉ. मोकाशी यांच्या लेखनाचा गौरव करताना ते म्हणतात, 'निरनिराळ्या विषयांचा त्यांचा मोठा व्यासंग आहे. अध्यापन, संशोधन, लेखन, मार्गदर्शन इ. बौद्धिक व्यापारात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतलेले आहे. यातून सकस, दर्जेदार लेखन त्यांनी व्रतस्त राहून सातत्याने केले आहे. त्यांचा हा आदर्श केवळ ग्रामीण महाविद्यालयांतील प्राध्यापकांनीच नव्हे तर शहरातील महाविद्यालयातील प्राध्यापकांनाही प्रेरणादायक ठरेल असा आहे. मराठी साहित्यांत मोलाची भर घालणाऱ्या डॉ. मोकाशी यांचे अभिनंदन!

**- शरद जोशी**
ग्रंथप्रसारक,
डोंबिवली.

# परिसर वार्ता

*दि. १ ऑगस्ट! विद्या प्रसारक मंडळाचा वर्धापन दिन. या वर्षी १ ऑगस्टला आमच्या घटक संस्थांच्या प्रमुखांनी आपापल्या संस्थांचे अहवाल सादर केले. परिसर वार्तात या अंका पासून एकेका घटक संस्थेचा अहवाल आम्ही देत आहोत. वाचकांना प्रगतीची कल्पना येण्याबरोबरच 'दिशा'मध्ये हे अहवाल भविष्यातही उपलब्ध व्हावेत हा यामागे हेतू आहे.- संपादक*

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

माध्यमिक विभागाची मुख्याध्यापिका या नात्याने मी सौ. सविता विनय केळकर, शालेय वर्ष २००४-२००५ चा अहवाल सादर करीत आहे.

**पूर्व प्राथमिक विभाग** - ह्या विभागाच्या प्रमुख सौ. विदुला वैद्य आहेत. पूर्व प्राथमिक विभागात १० शिक्षिका, १ लिपिका, ५ सेविका असून ४९९ विद्यार्थी शिकत आहेत. दरवर्षी गुरुपौर्णिमेपासून सुरु होऊन- मराठी १२ महिन्यांतील सर्व सण व उत्सव शाळेत साजरे केले जातात व आपल्या संस्कृतीची ओळख आपल्या विद्यार्थ्यांना करुन देण्यात येते. त्यातील प्रमुख सण व उत्सव - आषाढी एकादशीला काढलेली 'बालपंढरी दिंडी', नागपंचमी, गोकुळाष्टमी, गौरीपूजन, दिवाळी, विशेष म्हणजे 'बालगोपाळ भाजी मंडई' हा उपक्रम सादर केला जातो.

शालाबाह्य उपक्रमांमध्येही ही बालगोपाळ मंडळी भाग घेतात. संस्कृती कलादर्पण चित्र, कलास्पर्धा, रंगभरणे स्पर्धा, पाठांतर स्पर्धा इ. मध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभाग घेतात.

उत्साही शिक्षक अनेक संस्थांना भेटी देतात व शिबीरांमध्ये सहभागी होतात.

## शैक्षणिक अहवाल- 'प्राथमिक विभाग'

प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. कल्याणी वाघरे आहेत. फेब्रुवारी २००४ मध्ये झालेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेस इ. ४थी चे ५८ विद्यार्थी बसले होते. व 'प्रज्ञेश प्रकाश सरवणकर' हा विद्यार्थी ३०० पैकी २९४ गुण मिळवून जिल्ह्यात ५वा आला.

फेब्रुवारी २००४ मध्ये झालेल्या ज्ञानपीठ गणित परीक्षेस आमचे इ.३री चे २५८ विद्यार्थी बसले व परीक्षेत ९५% मुलांना यश मिळाले.

ह्या विभागातही अभ्यासाबरोबरच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी भाग घेतात. इ.२री च्या विद्यार्थ्यांनी 'संस्कृती कलादर्पण' संस्थेतर्फे झालेल्या लोकनृत्य स्पर्धेत तामिळ नृत्य सादर केले. व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

इतर संस्थांतर्फे होणाऱ्या पाठांतर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक बक्षिसे मिळवितात. विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षकही स्वतःची अध्यापन क्षमता वाढविण्यासाठी अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतात व परीक्षा देतात व उत्तम तऱ्हेने यश मिळवितात.

## शैक्षणिक अहवाल - माध्यमिक विभाग

आजच्या जगात आपले इप्सित साध्य करावयाचे असेल तर नियोजनाचं तंत्र आत्मसात करावंच लागतं. सर्वोत्तम आदर्श शाळेबद्दल सर्वांची एक कल्पना असते की आदर्श शाळा म्हणजे देखणी, भव्य इमारत,

विस्तृत क्रीडांगण, सर्व सुखसोयी उपलब्ध असणे. पण हे झालं बाह्य रूप! आदर्श शाळेला एवढेच निकष पुरेसे नसतात तर आपल्या वर्गात जे विद्यार्थी आहेत त्यांचा कल ओळखून त्यांच्यातील सुप्त कलागुण वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे व त्यांचा व्यक्ती विकास घडविण्यासाठी कौशल्यपूर्ण नियोजन करणे हे प्रत्येक शिक्षकाचे काम असते. मी आणि माझे ६० सहकारी याच वाटेने जाऊन शाळेचा जास्तीत जास्त विकास व प्रगती करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो.

जून मध्ये शाळा सुरु झाल्यावर पहिल्याच महिन्यांत S.S.C. शालांत परीक्षेचा निकाल लागला. ह्या परीक्षेत कु. दुर्गेश देशपांडेचा मुंबई विभागातील प्रथम क्रमांक व कु. अनुजा देशपांडेचा ११वा क्रमांक ह्या शाळेच्या इतिहासातील एका अविस्मरणीय आनंददायी बातमीने शालेय वर्ष २००४-२००५ ची सुरुवात झाली.

एकूण २७५ विद्यार्थ्यांपैकी २६३ उत्तीर्ण झाले. व शाळेचा निकाल ९५.९८% एवढा लागला.

| | |
|---|---|
| विशेष योग्यता | ७६ विद्यार्थी |
| प्रथम श्रेणी | ८८ विद्यार्थी |
| द्वितीय श्रेणी | ७५ विद्यार्थी |
| उत्तीर्ण श्रेणी | २४ विद्यार्थी |

- माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ७वी तील तन्मय फडके यास शिष्यवृत्ती मिळाली.
- त्याच्या पाठोपाठ लागलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत गार्गी मुणगेकर ९वी अ, अद्वैत इनामदार ६वी हे रौप्य पदकाचे मानकरी ठरले.
- हिंदी बालबोधिनी, प्रवेशिका परीक्षेचा निकाल १००%
- इंग्लिश प्री-एलिमेंटरी ९८% व एलिमेंटरी ९६%
- गणित ठाणे जिल्हा अध्यापक मंडळाच्या ५वी व ८वी संबोध परीक्षेचा निकाल

| | |
|---|---|
| ५वी संबोध | ९०% |
| ८वी संबोध | ८५% |

- संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत कु. स्मिता कोलते, कु. अनुश्री गोडबोले प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण.
- शासकीय चित्रकला परीक्षेत-सागर धावडे व विराज दामले एलिमेंटरी परीक्षेत 'अ' श्रेणी, प्रज्ञा चव्हाण इंटरमिजिएट परीक्षेत 'अ' श्रेणी मिळाली.
- गीता प्रतिष्ठान तर्फे गीताई स्पर्धेचा निकाल (१२वा अध्याय) निकाल १००% लागला.
- महाराष्ट्र इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा निकाल १००% लागला.
- **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा -**

**इयत्ता ८वी**

| | |
|---|---|
| गार्गी मुणगेकर | जिल्ह्यात ५वी |
| कु. अनुश्री गोडबोले | जिल्ह्यात ६वी |
| भूषण तासकर | राज्यात २४वा |
| कु. स्मिता कोलते | राज्यात २६वी |

**इयत्ता ९वी**

| | |
|---|---|
| सायली श्रोत्री | राज्यात २३वी |

- इयत्ता १०वी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत दुर्गेश अनिल देशपांडे हा यशस्वी व NTS शिष्यवृत्तीचा मानकरी.

➢ **अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन व त्यामधील विद्यार्थ्यांचे यश**

शालेय पातळीवर अभ्यास व्यवस्थित करुन उत्तम गुण

मिळविणारे आमचे विद्यार्थी अभ्यासपूरक स्पर्धा परीक्षांमध्ये सुद्धा कोठेही कमी पडू नयेत म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दरवर्षी विविध मंडळांची स्थापना केली गेली.(विज्ञान, गणित, मराठी, इतिहास इंग्लिश इ.)

- विज्ञान मंडळातर्फे विद्यार्थ्यांनी बांदोडकर महाविद्यालयातील औषधी वनस्पतींची पहाणी डॉ. सौ. मंगला बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली.
- 'मराठी विज्ञान परिषद', ठाणे यांच्यातर्फे 'शनीची कडी' या विषयावर प्रा. मोहन आपटे यांचे व्याख्यान व स्लाईड शो विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.
- जिल्हा परिषद आयोजित विज्ञान प्रदर्शनासाठी 'विकास तंत्रज्ञाचा, दोर वाढवी आयुष्याचा' ही प्रतिकृती विद्यार्थ्यांनी सादर केली.
- राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेतर्फे आयोजित केलेल्या तालुका स्तरीय बालविज्ञान परिषदेत, अल्फा स्कॉलर प्रश्नमंजुषेत, नेहरु सायन्स सेंटर व एच.डी.एफ.सी. यांच्या प्रश्नमंजुषेमध्ये 'ई टी.व्ही.' तर्फे आयोजित 'लढाई दहावीची' ह्या कार्यक्रमांत, संस्कृत गीत गायन स्पर्धेत व ग्रंथ दिंडी, खगोल प्रदर्शन इ. ठिकाणी विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्वक सहभाग होता.

➢ **कला व क्रीडा विभागातील यश :**

- कु. श्रद्धा यादव (७अ) हिने अखिल भारतीय गांधर्व मंडळातर्फे घेण्यात आलेल्या हार्मोनियम वादन परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून विशेष प्रावीण्य मिळविले व सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. तसेच गायन द्वितीय परीक्षेत ठाणे जिह्यातून तिसरा क्रमांक मिळविला व भरतनाट्यमच्या चौथ्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविले.
- सुप्रसिद्ध संगीतकार श्री. अनिल मोहिले यांच्या 'नादब्रह्म' या वृंदगायनात गडकरी रंगायतन येथे तिचा सहभाग होता.
- आमचा बालचित्रकार अखिल माने (८अ) याने मिळविलेली जिल्हा व राज्यस्तरिय बक्षिसे-

१. महाराष्ट्राचा 'बाल श्री' पुरस्कार १५०० मुलांमधून निवड, राज्यस्तरिय प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक व प्रशस्तिपत्रक.

२. 'जीवन' संस्थेतर्फे घेतल्या गेलेल्या राज्यस्तरिय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांकाची ट्रॉफी.

३. 'रिफा' एकदिवसीय चित्रकला सोहळा स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे ५०१/- रुपयांचे रोख पारितोषिक व प्रशस्तिपत्रक.

४. 'ठाणे महापौर चषक' (ठाकरे स्मृतीदिन) या तर्फे घेतल्या गेलेल्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे ७५०/- रुपयांचे पारितोषिक व प्रशस्तिपत्रक.

५. 'सामना' वर्तमानपत्रातून महाराष्ट्रातून होणाऱ्या 'कॅमल कलादालन' या राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक.

६. 'सामना' वर्तमानपत्रातून, महाराष्ट्रातून होणाऱ्या 'कॅमल रंगात रंगवा' या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे उत्तेजनार्थ पारितोषिक.

७. 'महाराष्ट्र टाईम्स' मधील 'कोरस हाय मार्क' च्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक.

अशा विविध सात स्पर्धांमधून स्पृहणीय यश मिळविले.

- प्रबोधनकार ठाकरे स्मृतीदिनानिमित्त 'अभिमान प्रतिष्ठान', ठाणे याचे तर्फे आंतरशालेय चित्रकला स्पर्धा

आयोजित केली होती. या स्पर्धेत सात्विक पेणकर (८वी अ) यास १००० रु. रोख, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह मिळाले.

अखिल माने यास द्वितीय क्रमांकाचे ७५०/- रुपयांचे पारितोषिक प्रमाणपत्रासह प्राप्त झाले. या दोन्ही विद्यार्थ्यांची चित्रे ठाण्याच्या महापौर सौ. शारदा राऊत आणि महाराष्ट्र वॉटर सप्लायर यांनी प्रत्येकी १०००/- रुपयांस विकत घेतली.

- 'Smart Kids Association' तर्फे आदर्श विद्यार्थी म्हणून अद्वैत इनामदार (६वी अ) याची निवड झाली.
- निसर्गमेळा पथनाट्य स्पर्धेत, गुरुवर्य कै. स. वि. कुलकर्णी यांच्या प्रथमस्मृतीदिना निमित्त घेण्यात आलेल्या पाठांतर स्पर्धेत, विवेकानंद जयंती निमित्त भारतीय युवा मोर्चा यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेत, विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांच्या मातोश्री कै. जानकीबाई गोखले यांच्या स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय भगवद्गीता पठण स्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता व अनेकांना पारितोषिके मिळाली.

➢ क्रीडा विभाग :

निरनिराळ्या मंडळातर्फे होणाऱ्या क्रीडास्पर्धेत कबड्डीमध्ये उदा. मावळी मंडळ, माजिवडा हायस्कूल, लिबर्टी मजदूर मंडळ इ. विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन आयोजित जिल्हा अजिंक्यपद चाचणी निवड कबड्डी स्पर्धेत, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन तर्फे, ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटीक संघटनेतर्फे, कोल्हापूर येथे सब ज्युनिअर ॲथलेटीक स्पर्धेत, तसेच ठाणे जिल्ह्याच्या या स्पर्धेत मुलांच्या व मुलींच्या संघाने भाग घेतला.

- 'बोर्नव्हिटा' आंतरशालेय बुद्धीबळ स्पर्धेत रसिका चिपळूणकर हिला ८ वा क्रमांक मिळाला.
- राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत 'संघाचा काता' या प्रकारात स्वप्नील घंगाळे यास सुवर्ण पदक मिळाले. तसेच स्वप्नील यास World Karate Competition मध्ये सुवर्ण पदक प्राप्त झाले. स्वीकार घंगाळे (६ब) यास World Karate Competition नवी दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक व सुशांत थोरात यास रौप्य पदक.
- ९व्या कोकण मराठी साहित्य परिषदेत प्रकाशित झालेल्या 'अक्षरांची पालखी' ह्या कविता संग्रहात सायली श्रोत्री हिची 'पावसाची किमया' व पल्लवी देव हीची 'आजीचा अमृत महोत्सव', कल्पेश झुंजाराव याची 'पाऊस येता' या कविता प्रसिद्ध झाल्या.
- पहिली राज्यस्तरीय 'ॲबॅकस ॲन्ड ॲरथमेटिक कॉम्पीटीशन' या स्पर्धेत केतकी लेलेस प्रमाणपत्र. या संस्थेतर्फे होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत वर्गातील मार्गदर्शनाबरोबरच विद्यार्थ्यांचे अनुभव विश्व वाढविण्यासाठी शालाबाह्य व्याख्यात्यांचे मार्गदर्शन व क्षेत्रभेटीही आम्ही आयोजित करतो.
- क्षेत्रभेट - दूरशेत येथे १७ ऑगस्ट २००४ - इ. १० च्या सर्व विद्यार्थ्यांनी भेट दिली.
- ६वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना कुष्ठरोग निर्मूलनावर आधारित चित्रफित दाखविली.
- बिर्ला सन लाईफ इन्शुरन्स कं. लि. तर्फे विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून अभ्यासपद्धती व मानसिक ताण कमी करण्यासाठी सौ. गायत्री बाक्रे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना सामुपदेशन करून मार्गदर्शन केले.
- 'Indian Fire & Safety Servicrs' तर्फे श्री. शिंदे ह्यांनी अग्नी सुरक्षेविषयक प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

- पालकांना आपल्या पाल्याच्या आहारविषयक विशेष मार्गदर्शन आहार तज्ज्ञ डॉ. सौ. मालती कारकारकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
- 'व्यवसाय मार्गदर्शन', 'पत्रकारिता मार्गदर्शन', 'मुलगी वयात येताना घ्यावयाची काळजी' या विषयावर स्लाईड शो आयोजित केला.
- 'सर्व शिक्षण मोहीम' अंतर्गत चौथे गट संमेलन शनिवार २२ जानेवारी २००५ रोजी ठाणे जिल्हा विस्तार अधिकारी श्री. पी. एन. पाटील यांच्या उपस्थितीत डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे येथे संपन्न झाले.
- इ. १० वी साठी विषयाप्रमाणे बाहेरील व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली होती.

➢ **समाजसेवा / मदत / निधी संकलन :**

अभ्यास, क्रीडा ह्यात नैपुण्य मिळवून विद्यार्थी यशस्वी होत असताना आपले समाजालाही काही ऋण आहे ह्याचा विसर आम्ही त्यांना पडू देत नाही.

- स्काउट गाईडच्या विद्यार्थ्यांनी स्वकष्टाने तयार केलेल्या राख्या विक्रीस ठेवून व आनंदमेळावा भरवून १०,००० रूपयांची कमाई केली.
- इ. ६ वी, ७ वी, ८वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी 'संजीवन बहुउद्दीशीय प्रगती संस्था' या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि त्यांच्या विकासासाठी काम करणाऱ्या संस्थेकरिता १३,०००/- रुपयांचा निधी जमा केला.
- १ जुलै २००४ वृक्ष दिंडीत ७० विद्यार्थ्यांचा सहभाग.
- ६ सप्टेंबर २००४ श्रावणी सोमवारी सेवाप्रकल्पाअंतर्गत कौपिनेश्वर मंदिरात भक्तांना दर्शन व्हावे म्हणून विद्यार्थ्यांनी मदत केली.
- २८ सप्टेंबर २००४ नौपाडा पोलिस स्टेशन यांचेतर्फे सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता व गणपती उत्सव सांगता समारंभानिमित्त एका मिरवणुकीच्या आयोजनात विविध राज्यांच्या पोषाखात इ. ८वी अ च्या विद्यार्थ्यांचा सहभाग.
- २० ऑगस्ट २००४ रोजी कै. राजीव गांधी यांच्या ६०व्या स्मृतीदिनानिमित्त 'अक्षय उर्जा दिन' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त रॅलीत विद्यार्थ्यांचा सहभाग.

➢ **शिक्षकांचा शाळाबाह्य कार्यक्रमात सहभाग :**

- सर्वशिक्षण मोहीमेअंतर्गत १५ शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. या मोहीमेअंतर्गत इ. ५ वी ते ८ वी ला शिकवणाऱ्या २९ शिक्षकांनी आपापल्या विषयाची शैक्षणिक साधने तयार केली.
- इ. ५ वी च्या 'इंग्रजी' या विषयाचे प्रशिक्षण ३ शिक्षकांनी घेतले.
- शाळेतील ५ शिक्षकांना LECT तर्फे १० दिवसांची लंडन येथे शैक्षणिक भेट देण्याची संधी मिळाली. ह्या १० दिवसांच्या वास्तव्यात आपल्या शिक्षकांनी लंडन येथील शाळांना भेटी दिल्या. तेथील कामकाज, शिकवण्याची पद्धत याचे आवलोकन केले. आपल्या शाळेत आपल्या विद्यार्थ्यांना शिकवताना शक्य असेल तेवढ्या पद्धतींचा उपयोग करून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना करून देण्याकडे निश्चितच हे शिक्षक कार्यरत राहतील.
- शाळेतील विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास करीत असताना शिक्षकांनीही शारीरिक दृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. त्यासाठी २००२ सालापासून १ मे रोजी दरवर्षी मी शिक्षकांसाठी एक व्याख्यानमाला सुरू केली आहे. त्यात -

२००२ साली - कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. आशिष भूमकर, २००३ साली - नेत्र तज्ज्ञ श्री. गानू, २००४ साली - योगाचार्य श्री. व्यवहारे यांचे मार्गदर्शन योगावर, २००५ साली -आयकर संबंधी श्री. राजदत्त ओक (C.A.) यांचे व्याख्यान झाले.


ह्या ठिकाणी मला अभिमानाने एक गोष्ट नमूद करणे आवश्यक वाटते की विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक बनविण्यासाठी उत्तम प्रयत्न करत असतानाच त्याचबरोबर आमच्या शिक्षकांना इतर अनेक शासकीय शालाबाह्य कामेही करावी लागतात. उदा. 'सर्व शिक्षण मोहीम' अंतर्गत - कुटुंब सर्वेक्षण, शाळेत न जाणाऱ्या मुलांचा आढावा, निवडणुकांची कामे, अपंग विद्यार्थ्यांसाठी असणारे विशेष फॉर्म भरून रजिस्टर तयार करणे इ.

तरीही या सर्व कामांबरोबर त्यांनी घेतलेल्या कष्टाचे चीज आमचे विद्यार्थी करतात आणि पुढेही निश्चितच करत राहतील.

हे आमच्या मागच्या पाच वर्षांच्या शालांत परीक्षांच्या निकालावरून दिसून येईल. दरवर्षी शालान्त परीक्षेच्या निकालात वाढच होत आहे.

आमच्या ह्या वर्षीचा शालांत परीक्षेचा निकालही ९८% लागला व १००% निकाल लागणाऱ्या विषयांची संख्या वाढली व २ टक्के कुठे कमी आहोत ते शोधून १०० टक्क्यांकडे वाटचाल चालू आहे.

गेल्या पाच वर्षातील १० वी चा निकाल




१००% निकाल लागणाऱ्या विषयांची संख्याही वाढत आहे. हिंदी, संस्कृत ह्या विषयांचा निकाल १००% लागला व कु. सावली श्रोत्री ही संस्कृतमध्ये बोर्डात पहिली आली.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

बांदोडकर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विषयातील विद्यार्थिनी प्रणाली गावकर २००४-०५ च्या विद्यापीठ परिक्षेत ८३.३७% गुण मिळवून मुंबई विद्यापीठात प्राणिशास्त्रात दुसरी आली.



**पारितोषिक स्वीकारताना प्रणाली गावकर**

**अभिनंदन**



**डॉ. नागेश टेकाळे**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील प्रपाठक डॉ. नागेश टेकाळे यांची अमेरिकन बायोग्राफिकल इन्स्टिट्यूटच्या सल्लागारांच्या

संशोधक मंडळावर मानद सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१९६७ पासून कार्यरत असलेल्या या संस्थेच्या संशोधक मंडळींनी सुचविलेल्या नावांचा 'चरित्र संदर्भ ग्रंथासाठी' विचार करण्यात येतो. या चरित्र ग्रंथांना फार मोठे संदर्भ मूल्य असून जगभर अशा व्यक्तींचे कार्य पोहोचविण्याचे काम हे संदर्भ ग्रंथ करतात.

डॉ. टेकाळे यांना त्या संस्थेच्या अध्यक्षांचे जे पत्र आले आहे त्यात अशा गुणवत्ताधारक व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींची नावे सुचविण्यास सांगण्यात आले आहे. तसेच नियुक्तीचे प्रमाणपत्रही डॉ. नागेश टेकाळे यांना देण्यात आले आहे. डॉ. नागेश टेकाळे यांचे अभिनंदन.

➢ **पदार्थ विज्ञान मंडळाचे उद्घाटन :**

''पिरॅमिड मध्ये ठेवलेले पाणी खराब होत नाही किंवा ब्लेड वा अन्य शस्त्रांची धार कमी होण्याऐवजी वाढते,'' असे उद्गार मुंबई विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख डॉ. एस्.जे. गुप्ता यांनी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पदार्थ विज्ञान मंडळाने आयोजित केलेल्या ''पिरॅमिड उर्जेच्या शास्त्रीय बाजू'' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. पदार्थ विज्ञान मंडळाच्या या उद्घाटनपर समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. माधुरी पेंजावर होत्या. पदार्थ विज्ञान मंडळाचे संयोजक प्रा. पी.के. भट यांनी स्वागतपर भाषण केले. तर प्रा. नामदेव मांडगे यांनी डॉ. गुप्ता यांचा परिचय करून दिला.

डॉ. गुप्ता यांनी स्लाईडस्‌च्या आधारे पिरॅमिडच्या शास्त्रीय रचनेबाबत विवेचन केले. समारंभास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहसचिव रविश पाटील याने आभार प्रदर्शन केले.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर**

२००५-२००६ या शालेय वर्षाची सुरवात नेहमीप्रमाणे १३ जून रोजी झाली. दि. ७ जुलै रोजी E.T.V. वर 'लढाई १०वी ची' च्या अंतर्गत १०वी च्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम झाला. प्रथम फेरीत आपल्या शाळेतील कु. रेणुका पेंडसे (१०अ), कु. अनुश्री गोडबोले (१०अ) यांनी बाजी मारली.

दि. २५ जुलै रोजी Indian Cancer society ने कॅन्सर म्हणजे काय? कॅन्सर कशाने होते? तो कसा ओळखावा? त्यावर प्रतिबंधात्मक उपाय कोणते? कॅन्सर बरा होऊ शकतो का? वगैरे मुलांना, मोठ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊन vidio film च्या द्वारे मुलांमध्ये जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

दि. ३० जुलै रोजी 'ठाणे जिल्हा अध्यापक संघाने' एक दिवसीय कृती सत्र शारदा मंदीर हायस्कूल, कल्याण येथे आयोजित करण्यात आले. त्यात आपल्या शाळेतील कला शिक्षक श्री. विलास कोळी यांना पाठविण्यात आले.

दि. ३० जुलै रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्ताने सर्व वर्गातून हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यांतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. तसेच दि. ३ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथी निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली.

| | |
|---|---|
| ५वी व ६वी - लो. टिळक यांचे | बालपण |
| ७वी व ८वी - " " | सामाजिक कार्य |
| ९वी व १० वी - " " | राजकीय कार्य |

असे वर्गवार विषय देण्यात आले त्यातील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. १ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचा ७०वा वर्धापन दिन थोरले बाजीराव पेशवे सभागृहात साजरा करण्यात आला. त्यांत आमच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांनी शाळेचा वर्षभर होत असलेल्या उज्वलतेचा आढावा घेतला.

दि. ३ ऑगस्ट रोजी I.P.H.तर्फे १०च्या विद्यार्थ्यांसाठी मनातील ताणतणाव कसा दूर करावा हे सौ. ढगे व सौ. दातार यांनी नाट्यीकरणातून अतिशय सुंदर रीत्या समजावून सांगितले. व मुलांनी हलके फुलके कसे व्हावे हे ही प्रश्नउत्तरातून समजावून सांगितले.

दि. ३ ते ८ ऑगस्टच्या दरम्यान, 'सर्व शिक्षा अभियान सेवांतर्गत प्रशिक्षणा' साठी आपल्या शाळेतील इ. ८वीला शिकविणाऱ्या शिक्षकांचे कृति संशोधन विषयक प्रशिक्षण झाले. आपल्या शाळेतील सौ. मिनाक्षी कुमावत व श्री. करमसिंग सोनवणे यांनी उपस्थित राहून हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

दि. ९ ते १० ऑगस्ट रोजी घंटाळी मित्र मंडळ, ठाणे संचलित मेधा संस्कार शिबीर इ.९वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. आपल्या शाळेतील श्री. प्रकाश पांचाळ, श्री. उमेश शिरापुरी, सौ. सुषमा बोऱ्हाडे, सौ. यामिनी धनगर, आशा जोशी यांनीही या शिबीराचा लाभ घेतला.योगाचार्य श्री. श्रीकृष्ण व्यवहारे यांचे या शिबीराला मार्गदर्शन लाभले.

दि. १० ऑगस्ट रोजी 'Dentech' तर्फे डॉ. विवेक कर्वे यांनी आपल्या शाळेतील इ. ५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या दातांची मुफत तपासणी केली. त्यांना डॉ. स्मृता नंबियार व डॉ. कविता कोलते यांनी सहाय्य केले.

## ध्वजारोहण

विद्याप्रसारक मंडळाच्या घटक संस्थांचे एकत्रित ध्वजारोहण ठाणे महाविद्यालयाच्या परिसरात दि.१५ ऑगस्ट रोजी झाले. विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांना शपथ दिली. याप्रसंगी भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रमाणाविषयी त्यांनी आपल्या मनोगतात चिंता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी 'भारतामाता' हे विचार नाट्य सादर केले.

कार्यक्रमास विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोला मुद्रित

'दोला मुद्रिते' या शद्वाच्या व्याख्येचा व कालावधीचा पुनर्विचार करावयास हवा'' असे उद्‌गार विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी दि.१२ ऑगस्ट रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात बोलताना काढले. महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या 'दोला मुद्रिते' या विषयावरील डॉ. प्रदीप कर्णिक यांच्या व्याख्यानाच्या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी केले. या कार्यक्रमास ग्रंथालय व माहिती शास्त्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. म. रा. रिसवडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. वि. करंदीकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या वेळी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयावर प्रबंध सादर करून पुणे विद्यापीठाची पी.एच.डी. पदवी मिळाल्याबद्दल रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. प्रदीप कर्णिक यांचा ग्रंथालय शाखा विभागातर्फे प्रा. रिसवडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात

आला. तसेच त्यांचे मार्गदर्शक डॉ. शरद गणपुले यांचाही डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा. रिसवडकर यांनी डॉ. कर्णिक यांच्या प्रबंध व प्रबंध विषयासंदर्भात माहिती देणारे व्याख्यान दिले. डॉ. शरद गणपुले यांचेही यावेळी व्याख्यान झाले.

दोला मुद्रिताचा कालखंड हा देशापरत्वे बदलू शकतो असे सांगून डॉ. प्रदीप कर्णिक यांनी मराठीतील दोला मुद्रितांसंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती सादर केली. समारंभास अनेक महाविद्यालयाचे ग्रंथपाल, सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्यकर्ते व ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. श्री. शरद ललित यांनी आभारप्रदर्शन केले.

### अनुबंध आयोजित कवी संमेलन

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'अनुबंध' माजी विद्यार्थी संघातर्फे रविवार दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता एका अनौपचारिक कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे थोरले बाजीराव पेशवे सभागृहातील ज्ञानपीठावरील शेडमध्ये निसर्गरम्य वातावरणात हे कवी संमेलन झाले. ठाण्यातील कवी रामदास खरे हे विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित होते.

या कवी संमेलनात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. उदय निरगुडकर, श्री. गीतेश शिंदे, कु. सृष्टी अंकोलेकर, श्री. गिरीश तिळवे, यांनी कविता सादर केल्या. त्याचबरोबर ठाण्यातील काही तरुण कवी मित्रांनाही कविता सादर केल्या. अनुबंधचे संघटक प्रा. मोहन पाठक यांनी प्रास्ताविकात ज्ञानपथ व ब्रम्हगुप्त बैठकीची माहिती दिली. सूत्रसंचालन करताना त्यांनी 'अनुबंध' या संकल्पनेविषयी स्पष्टीकरण केले.

सहभागी कवींनी अशाप्रकारचे निसर्गाच्या वातावरणात कार्यक्रम वारंवार अनुबंधने घ्यावेत अशी इच्छा प्रदर्शित केली.

### ''सृष्टी''

निसर्गातील अगदी लहानशी गोष्टही मग ते एक साधं गवतफूलही का असेना, आपल्या मनाला अगदी सहजपणे आनंद देऊन जातं. हाच आनंद विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातही उपभोगता यावा यासाठी आमच्या वनस्पतीशास्त्र या विभागाने 'सृष्टी' क्लब असा विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठीच सुरू केलेला एक उपक्रम. या क्लब अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, निसर्गाच्या विविध पैलूंचे, निसर्गात चालणाऱ्या विविध घडामोडींचे शास्त्रीय दृष्टिकोनातून प्रदर्शन तसेच इतर कार्यक्रम आयोजित करून सर्वांना निसर्ग आपल्या सभोवती आहेच, पण आपणच या निसर्गाच्या कुशीत सामावलेले आहोत ही जाणीव करून दिली जाते.

तर अशा या 'सृष्टी' क्लबचे या वर्षी चौथ्या वर्षात पदार्पण झाले. या वर्षातली पहिली सभा दि. ३ ऑगस्टला घेण्यात आली. या सभेत 'सृष्टी क्लब'ची नवीन कार्यकारिणी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आली. सचिवपदी क्षितीजा, सहसचिवपदी विनिता तर खजिनदारपदी संघमित्रा यांची नियुक्ती करण्यात आली. पुढच्या तीन दिवसांत सुमारे ४० विद्यार्थ्यांनी प्रत्येकी २०रू. वर्गणी देऊन सभासदत्व प्राप्त केले. विद्यार्थ्यांचा हा प्रचंड प्रतिसाद पाहून आमचा उत्साहही दुणावला. खरं तर 'सृष्टी'चा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे प्रदर्शन. दरवर्षी विद्यार्थी विविध विषयांवर आधारित प्रदर्शन भरवून सर्वांना वनस्पतींचे महत्त्व पटवून देतात, परंतु प्रदर्शन आयोजित करण्यास लागणारा वेळ लक्षात घेता, आम्हाला या सर्वांच्या आवडत्या कार्यक्रमास थोडा फाटा द्यावा लागला.

यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून "Flowers of Sahyadri" आणि 'आसमंत' या लोकप्रिय पुस्तकांचे लेखक आणि प्रख्यात उद्योजक श्री. इंगळहळीकर यांना

आमंत्रित करण्याचे ठरले. खरं तर लेखक आमच्या लहानशा कार्यक्रमाला येण्याचं मान्य करतील की नाही शंकाच होती. पण ही जबाबदारी आमच्या संयोजक व वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सौ. मुळगावकर यांनी अगदी सहजपणे पार पाडली.

आमचे आमंत्रण त्यांनी स्वीकारल्याचे कळताच आमच्या आनंदाला पारावारच उरला नाही. समारंभ १३ ऑगस्टला असल्याने १२ तारखेपर्यंत बहुतांशी तयारी झाली. सर्वांनी मिळून अतिशय आकर्षक निमंत्रण पत्रिका तयार करून कॉलेजच्या सर्व विभागांना निमंत्रणे पाठविली होती. अखेर आम्ही सर्वजण ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत होतो तो दिवस उजाडला.

दि. १३ ऑगस्ट २००५, शनिवारी सकाळी ११.४५ वाजता प्रमुख पाहुणे 'श्री. इंगळहळीकर' यांच्या हस्ते श्रीगणेशासमोरील दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी कु. प्रिया मराठे हिने स्वागतार गीत सादर केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख कु. सुमित भामरा हिने करून दिली. यानंतर प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व उपप्राचार्या प्रा. अकोलकर तसेच सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. ह्या सर्व उपस्थितांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागतपर भाषण व 'सृष्टी'ची माहिती कु. क्षितिजा हिने करून दिली. तर आभार प्रदर्शन सुजाता हिने केले.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. श्रीकांत इंगळहळीकर यांनी आपल्या सोबत आणलेल्या L.C.D. मार्फत जणू काही आम्हाला एका नवीन विश्वाची सैर घडवून आणली.

श्री. श्रीकांत इंगळहळीकर हे जरी व्यवसायाने एक Mechanical Engineer असले तरी त्यांचे वनस्पतिशास्त्राचे ज्ञान सर्वांना थक्क करणारे आहे, पण याचबरोबर ते एक उत्तम photographer ही आहेत. हे त्यांनी काढलेल्या आणि अगदी जिवंत वाटाव्यात अशा प्राणि आणि फुलांच्या छायाचित्रांवरून स्पष्ट होते. प्रत्येक फुलाचे वर्णन त्यांनी इतक्या सहजपणे केले की सर्वांना मनात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाची उत्तरे आपोआपच मिळत गेली. ''निसर्गाचा आस्वाद कसा घ्यावा'' याचा नवा मंत्र आम्हाला त्यांच्याकडून मिळाला. त्यांच्याकडून आम्हाला 'Digital Herbariun ही एक नवीन संकल्पना मिळाली. खरंच जर आपण सर्वच पाने-फुले तोडून त्यांचे जतन करायला लागलो तर आधीच दुर्मीळ झालेल्या अनेक वनस्पतींचा ऱ्हास व्हायला फार वेळ लागणार नाही. शिकारीचं वेड बऱ्याच लोकांना असतं पण, वनस्पतींचे निरिक्षण करताना आपण काही अनोख्या शिकारींचाही आस्वाद घेऊ शकतो हे श्रीकांत सरांकडूनच समजलं. लहान-लहान कीटकांना शिकार करताना पाहण्यात एक वेगळीच मजा असते. वनस्पती शास्त्राचे विद्यार्थी असूनही आम्हाला वनस्पतींबद्दल ज्या गोष्टी माहीत नव्हत्या त्या आम्हाला श्रीकांत सरांकडून समजल्या. खरं तर एवढ्या मोठ्या व्यक्तीचा सहवास आम्हाला लाभला हे आमचं भाग्यच समजायला हवं.

आता शेवटचं पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाचे मन उल्हासित करणाऱ्या पुष्परचना. कॉलेजच्या आवारात असलेल्या विविध वनस्पती, पावसाळ्यात उगवणारी सुंदर गवतफुले, कर्दळी, जर्बेरा, गुलाब यांसारखी रंगीबेरंगी फुले फुलदाणीत आकर्षकपणे मांडण्यात आली होती. ममता सिंग हीने अस्टर आणि गुलाबाच्या फुलांपासून केलेली पुष्परचना व त्यात असलेले निरांजन प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत होती. सोनाली, पद्मीनी, सतींदर आणि प्रीती यांनी काढलेली रांगोळी प्रत्येक येणाऱ्याचे स्वागत करत होती. रोहित व कुणाल यांनी पुष्पगुच्छ आणण्यास मदत केली. तर अशा ह्या विद्यार्थ्यांच्या 'सृष्टी' क्लबचा पहिला कार्यक्रम सफल करण्यासाठी तसेच कार्यक्रमाची रूपरेखा

आखण्यात आम्हाला आमच्या संयोजक व विभागप्रमुख डॉ. सौ. मुळगावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याच बरोबर डॉ. सौ. सहा, डॉ. सौ. थोरकर, डॉ. जमदाडे ह्या प्राध्यापकांनीही अनेक प्रकारे मार्गदर्शन केले. तसेच प्रयोगशाळेचे प्रमुख श्री. गणेश धारप व सहकारी श्री. रवींद्र सावंत, श्री. सहदेव फडके, श्री. धोंडीबा खापरे व श्री. राकेश बने ह्यांचे सुद्धा सहकार्य लाभले. शिवाय L.C.D.दाखविण्यासाठी प्रोजेक्टरची गरज होती आणि ती पुरविण्याऱ्या I.T. विभागाचेही आभार मानलेच पाहिजे.

आमच्या ह्या 'सृष्टी क्लब'च्या पहिल्या कार्यक्रमाला जे जे विद्यार्थी, सर्व विभागाचे प्राध्यापक यांनी भेट देऊन आम्हाला प्रोत्साहित केले, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अशाच प्रकारे जर आम्हाला आपणा सर्वांचे सहकार्य लाभले तर, येणाऱ्या प्रत्येक वर्षी 'सृष्टी क्लब' चा प्रत्येक कार्यक्रम यापेक्षाही चांगला होईल अशी खात्री वाटते.

शद्बांकन : शुभांगी ना. बेलवले
तृतीय वर्ष, वनस्पतिशास्त्र

## एम्.एम्.एस्. अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन

विद्याप्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापनशास्त्र संस्थेला यंदा एम्.एम्.एस्. साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता मिळाली असून अभ्यासक्रमाचे औपचारिक उद्‌घाटन मंगळवार दि. २३ ऑगस्ट रोजी करण्यात आले. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात प्रा. अय्यर यांच्या मंत्रोच्चाराने झाली. दीपप्रज्ज्वलन व सरस्वती पूजनानंतर संस्थेचे नवनियुक्त संचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सहसंचालक डॉ. बाकरे यांनी कै. डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या दूरदर्शीपणाचा उल्लेख केला. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या गौरव चौवळ, अमृता मधुरे, प्रकाश नारायणन, कौस्तुभ पाल या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष आपल्या भाषणात म्हणाले, ''दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अविरत कार्य करणाऱ्या विद्याप्रसारक मंडळाच्या इतिहासातील आजचा दिवस आहे.'' स्वव्यवस्थापन महत्त्वाचे असून आपल्या आजूबाजूच्या लोकांशी असणाऱ्या संबंधांचे व्यवस्थापन करण्याची आज गरज आहे.

समारंभास विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी, परिसरातील महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक, तसेच निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन श्रीमती पूजा लखनपाल यांनी केले.

- संकलित

### लेखनासाठी काही विषय

- ❖ आंतरराष्ट्रीय पदार्थ विज्ञान वर्ष
- ❖ आईन्स्टाईनचा सापेक्षतावाद
- ❖ घन कचरा व्यवस्थापन
- ❖ मी या प्रकल्पात ''बिझी'' आहे, अर्थात प्रकल्प परिचय
- ❖ संशोधन, कशात कसे ?
- ❖ ग्रंथ संस्कारातील/सहवासातील काही क्षण
- ❖ दांडी यात्रा आणि आजचा संदर्भ
- ❖ आय. पी. आर्.
- ❖ तत्त्वज्ञानाचे नवे ज्ञान
- ❖ ... आणि मी वाचायला लागलो
- ❖ सर्वांसाठी आरोग्य, सर्वांसाठी शिक्षण आणि 2020 साल !
- ❖ भारत महासत्ता बनविण्याच्या दृष्टिने